स्वादमय सेवेचा • राजस्थानी थाळी •
स्वादिष्ट.. रुचकर
भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर फोन: 2327060, 9850799850

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
काापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. ०५.०८.२०२४ | अंक नं. १३३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लँकेट, सोफा कव्हर्स, योग मॅट, क्लिनिंग मटेरियल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# महिलेवर चाकूने वार करत ‘चेन स्नॅचिंग’ नगर शहरासह उपनगरात चाललंय काय?

## ‘पोलिस दादा’ आता तुम्हीच सांगा ’आम्ही घराबाहेर पडायचे की नाही?’ महिलांचा जिल्हा पोलिस यंत्रणेला सवाल

नगर – नगर शहर व उपनगर परिसरात गेल्या ९ दिवसांपासून दररोज महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना घडत आहेत. शनिवारी (दि.३) रात्री शहरातील आगरकर मळा परिसरात तर या चोरट्यांनी कहरच केला. रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्याला चाकू लावून आणि त्यांना चाकूने वार करत जखमी करून त्यांच्या गळ्यातील ३ तोळे वजनाचे सोन्याचे गंठन हिसकावून नेले आहे. दररोज या घटना घडत आहेत, आणि आता तर चोरटे हिंसक होऊ लागले आहेत. मात्र पोलिसांना या चोरट्यांना पकडण्यात अद्यापही यश आले नसल्याने ’पोलिस दादा आता तुम्हीच सांगा... महिलांनी घराबाहेर पडायचे की नाही?’ असा सवाल महिला वर्गाकडून उपस्थित केला जात आहे.

नगर शहरासह उपनगरात दि.२६ जुलै चेन स्नॅचिंगचे सत्र सुरु झालेले आहे. तेव्हापासून ९ दिवसांत तोफखाना पोलिस ठाण्यात ४ तर कोतवाली पोलिस ठाण्यात ५ असे एकूण ९ गुन्हे दाखल झाले आहेत. २६ जुलैला सायंकाळी सावेडी उपनगरात अवघ्या अर्ध्या तासाच्या अंतराने भुतकरवाडी व पाईपलाईन रोड या दोन ठिकाणी रस्त्याने पायी चाललेल्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने मोटारसायकलवर आलेल्या २ अज्ञात चोरट्यांनी हिसका मारून तोडून नेले. त्यानंतर ३० जुलैला रात्री ९.४५ च्या सुमारास केडगावच्या भुषणनगर परिसरात आणि रात्री १०.३० ते १०.४५ च्या सुमारास गुलमोहर रोड परिसरात असलेल्या कोहिनूर मंगल कार्यालयाजवळ पुन्हा अशाच चेन स्नॅचिंग झाल्या. ३१ जुलैला रात्री ७.४५ च्या सुमारास माणिक नगर परिसरात तर रात्री ९.३० च्या सुमारास नालेगाव परिसरात टांगेगल्लीत आणखी एक चेन स्नॅचिंग झाले.

शुक्रवारी २ ऑगस्ट रोजी रात्री आठ ते साडेआठच्या दरम्यान सावेडीतील डॉनबॉस्को कॉलनीत फिर्यादी किरणज्योत सुखविंदर कालरा (वय २१ रा. डॉनबॉस्को कॉलनी) व त्यांच्या आई अशा दोघी रस्त्याने पायी चाललेल्या असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी फिर्यादीच्या आईच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची चेन ओरबाडून दुचाकीवरून भरधाव वेगात निघून गेले.

### अगोदर चाकूने वार मग ’चेन स्नॅचिंग’

स्टेशन रोडवर आगरकर मळा परिसरात तर शनिवारी (दि.३) रात्री चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्याने कहरच केला. या भागात सागर कॉम्प्लेक्समध्येमध्ये राहणाऱ्या सुरेखा बाळाराम गुगळे (वय ६४) या रात्री गृहिणी रात्री ९.२७ च्या सुमारास कॉलनीतील रस्त्याने पायी चाललेल्या असताना तोंडाला मास्क बांधलेला एक अंदाजे २५ ते ३० वयाचा इसम एका काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर आला. त्याने गुगळे यांच्या जवळ जावून गाडी थांबवत त्यांच्या गळ्याला चाकू लावला. त्या वेळी त्या प्रतिकार करायला लागल्या असता त्यांच्यावर चाकूने वार करत त्यांना जखमी केले आणि त्यांच्या गळ्यातील ३ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण हिसका मारून तोडत ते घेवून मोटारसायकलवर भरधाव वेगात पसार झाला. याबाबत गुगळे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### केडगावमध्ये ३ चोरट्यांनी केले ’चेन स्नॅचिंग’

दरम्यान केडगाव उपनगरात हॉटेल संदीप समोर असलेल्या मोतीबाग सोसायटीत आणखी एक ’चेन स्नॅचिंग’ ची घटना घडल्याचे समोर आले आहे. ही घटना शनिवारी (दि.३) सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली असून याबाबत रविवारी (दि.४) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आतापर्यंतच्या घटनेत १ किंवा २ चोरटे मोटारसायकल आल्याचे समोर आले होते. मात्र या घटनेत एकाच मोटारसायकलवर ३ चोरटे होते असे फिर्यादी महिलेने पोलिसांना सांगितले आहे. याबाबत प्रतिभा प्रल्हाद साठे (वय ४०) यांनी फिर्याद दिली आहे. साठे या सायंकाळी कॉलनीतील रस्त्याने फिरत असताना काळ्या रंगाच्या मोटारसायकल वर आलेल्या तिघांनी त्यांच्या गळ्यातील ५५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावून नेल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

### महिला वर्गात पसरले भीतीचे वातावरण

गेल्या ९-१० दिवसांपासून शहराच्या विविध भागात दररोज चेन स्नॅचिंगच्या घटना घडत असल्याने आणि पोलिसांना त्यांचा कुठलाही धागादोरा मिळत नसल्याने शहरासह उपनगरी भागात महिलांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. आता तर हे चोरटे हिंसक बनू लागले असल्याने महिला वर्गाच्या मनातील भीतीमध्ये वाढ झाली आहे. पोलिसांनी या चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

### अवैध धंद्यांवरील कारवाईचे स्वागत पण चोरट्यांचे काय?

खा. निलेश लंके यांनी पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषण केल्यानंतर जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस अधिकारी - कर्मचाऱ्यांना अवैध धंद्यांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गेल्या १०-१२ दिवसांपासून जिल्ह्यात अवैध दारू विक्री, जुगार, मटका, सुगंधी तंबाखू, गुटखा अशा धंद्यांवर सर्वत्र पोलिसांकडून छापेमारी सुरु आहे. या कारवाईचे स्वागतच आहे. मात्र गेल्या ९-१० दिवसांत शहरात चेन स्नॅचिंग करणाऱ्या *(पुढील मजकूर पान २ वर)*

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

veenaworld.com
येतोय लॉंग वीकेंड
कुठे आहात तुम्ही?
ऑगस्ट मध्ये मस्त सुट्ट्या आहेत, पटकन ठरवा आणि करून या भारतातील किंवा परदेशातील एखादी मस्त टूर.
चलो, बॅग भरो, निकल पडो!
वीणा वर्ल्डसोबत



पुणे ते पुणे टूर्सही उपलब्ध
वीणा वर्ल्डच्या ऑल इन्क्लुसिव्ह ग्रुप टूर्समधून तुमच्या आवडीची टूर निवडा. संपूर्ण माहितीसाठी veenaworld.com ला भेट द्या.
हायलाइट्स ऑफ लडाख (ex-Pune) 7D Aug 24
बेस्ट ऑफ लडाख (9D) Aug 23
कश्मीर एस्केप (5D) Aug 19
वंडर्स ऑफ कश्मीर (7D) Aug 18, 25
शिमला मनाली (6D/8D) Aug 17/Aug 24
डलहौसी धरमशाला अमृतसर (8D) Aug 25
नैनिताल मसूरी हरिद्वार (6D) Aug 13
दिल्ली आग्रा (5D) Aug 20
हायलाइट्स ऑफ राजस्थान (6D) Aug 23
पाटण मोढेरा+स्टॅच्यु ऑफ युनिटी - (ex-Pune) (5D) Aug 21
हायलाइट्स ऑफ केरळा (6D) Aug 25
वंडर्स ऑफ केरळा (8D) Aug 21
बेस्ट ऑफ नेपाळ (8D) Aug 25
बेस्ट ऑफ भूतान (9D) Aug 23
बेस्ट ऑफ श्रीलंका (7D) Aug 11
हायलाइट्स ऑफ थायलंड (4D) Aug 22
हायलाइट्स ऑफ दुबई अबुधाबी (5D) Aug 11, 14, 17
हायलाइट्स ऑफ दुबई अबुधाबी - (Pure Veg) (5D) Aug 13
बेस्ट ऑफ दुबई अबुधाबी (7D) Aug 24
सिनियर्स स्पेशल काश्मीर (6D) Aug 19
सिनियर्स स्पेशल शिमला मनाली (8D) Aug 17
सिनियर्स स्पे नैनिताल मसूरी हरिद्वार (6D) Aug 18
सिनियर्स स्पेशल व्हिएतनाम (8D) Aug 17
सिनियर्स स्पेशल दुबई अबुधाबी (5D) Aug 25
मैं हूँ ना!
वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे 9850063432
लालटाकी रोड, कालिका प्राईड, ऑफिस नं. 206, २ रा मजला, अ.नगर.

ऋणनिर्देश



स्व.इंदूबाई पेमराजजी गुगळे
गुगळे पेपर मार्ट
यांना २ ऑगस्ट २०२४ रोजी देवाज्ञा झाली.
आणि आम्ही शोकाकूल झालो. त्यांच्या निधनानंतर
आमच्यावर कोसळलेल्या दुःखात आमचे अनेक आप्तेष्ट,
मित्र, सहकारी सहभागी झाले व सांत्वन केले.
त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक ऋणी आहोत.
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
पनालालजी गुगळे (पुणे) । अरविंदजी गुगळे (नगर)
सौ.स्मिता राजेंद्र गुंदेचा । सौ.अनिता धनेषजी गांधी
हर्षल राजेंद्र गुंदेचा
सौ.पायल सुधीरजी संघवी (धुळे) । सौ.कोयल विरेंद्र मुथ्था (पुणे)
समस्त गुगळे परिवार


Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

एक नातं शुद्धतेचं आणि परंपरेचं...
सस्नेह निमंत्रण
उद्घाटनानिमित्त २२ कॅरेट सोने-चांदीचे दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मजुरीवर १० ते ५० टक्के डिस्काउंट ६ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर पर्यंत
आमच्या यशाचे सारे श्रेय आपणास...
आम्ही आता आपल्या सेवेसाठी सावेडी, पाईपलाईन रोड येथे नविन रुपात येत आहोत..
SNJ श्री निखिल ज्वेलर्स
या नूतन दालनाचा
उद्घाटन समारंभ
मंगळवार, दि. ६ ऑगस्ट, २०२४ सकाळी ११ वा.
श्री गुरुवर्य राजू देवा तुंगार (मदडगाव)
यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
-: आपली विनीत :-
श्री. नरेंद्र जनार्दन लोळगे
श्री. निखिल नरेंद्र लोळगे श्री. वैभव नरेंद्र लोळगे
स्थळ :- एकवीरा चौक, सिटी प्राईड हॉटेल जवळ, कबीर केक शेजारी, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर
संपर्क : मो. ९८२२६३६४५०, ९७४९०४०४०४, ९८२२८८९००३
Auras Advt



आकर्षक टॉईजवर २५% सूट
गिफ्ट अँण्ड स्कूल स्टेशनरी होलसेल अँण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट अँण्ड टॉईज
आर.एन.आर्ट अँण्ड क्राफ्ट
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर.
मो : 9325329061 / 9373417113



* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध. * सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
अक्षय (गिते) हॉस्पिटल
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

चौथे पुण्यस्मरण
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..



कै.गं.भा.रत्नमाला अरुणराव फुलसौंदर
स्व. दि. ६/८/२०२०
: दुःखांकित :
समस्त फुलसौंदर परिवार, अ.नगर



EARTH's Green Library
Greenery for Every Space
Indoor Plants for your Home!
Get a Plant Today!
Indoor Plants | Potted Planters | Premium Planters
Garden Accessories | Garden Furniture | Garden Lightings
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## श्रद्धा जीवन फुलवते

श्रद्धावान माणसाचं जीवन हे खरं सुखी जीवन! श्रद्धाळू जनांचा आयुष्यात गोंधळ उडत नाही. समाजाच्या साऱ्या विसंगतीत त्यांना हेतू व सूत्र दिसू शकतं. संसाराच्या बिकट समस्या त्यांना खुळ्या वाटतात. निसर्गाची सारी संकटं कस्पटासमान वाटतात.

श्रद्धेचं एक अतार्किक प्रमेय स्विकारलं की विश्वाची अनेक कोडी भराभर उलगडू लागतात. किंबहुना श्रद्धावानांना कोडी पडत नाहीत, समस्या भेडसावित नाही. ते अस्वस्थ होऊच शकत नाही. त्यांचं आयुष्य सहज गंभीर होऊन जातं.


धर्म अन् श्रद्धा म्हणजे अफूची गोळी हे खरंच आहे पण त्याचबरोबर केवळ श्रद्धेच्या बळावर सामान्य माणसंही अचाट कृती करू शकतात हेही खरं आहे ना? अनेकदा वाटतं आपली आत्मिक अस्वस्थता व बेचैनी संपवण्याचा एक अत्यंत सोपा मार्ग म्हणजे श्रद्धाळू बनणं.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

मला तर नेहमी वाटतं चांगल्या गोष्टींवर श्रद्धा ठेवायला काय अडचण असावी! ज्ञान, विवेक ठेवल्यास श्रद्धेचे रुपांतर अंधश्रद्धेत होत नाही. अन्याय, अत्याचार, विषमता, दारिद्र्य, शोषण या साऱ्यांचं किती सहज व सोपं समर्थन सर्वच धर्मामध्ये आहे. फक्त बुद्धीप्रामाण्यवादाचा हेका सोडून लीनपणे श्रद्धाळू बनायला हवं.

सबुरी ठेवून श्रद्धेवर विश्वास ठेवायला शिकायला हवं. भारतीय भावभावनांची ही श्रद्धा जीवनाला उत्कट बनवते. कर्मसिद्धांत, पुनर्जन्म व समस्यांची उकल यांची उत्तरं श्रद्धेतूनच येतात.



अहमदनगर बॉईज हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक

## वसंतराव त्रिभुवन यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील अहमदनगर बॉईज हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक पास्टर वसंतराव त्रिभुवन (राणा सर, वय ८६, रा. गुलाबसिंग कंपौंड, नगर) यांचे ३० जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्यावर सी.एन.आय. चर्च, सिद्धार्थनगर दफनभूमीत अत्यसंस्कार करण्यात आले.

ते धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात देश, परदेशात जाऊन संदेश देत असत. त्यांच्यामागे अशोक त्रिभुवन हे एक बंधू, पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

सी माणिकलाल कंपनीचे मालक

## ओमप्रकाश परदेशी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रामचंद्र खुंट येथील रहिवासी व कापड बाजारातील सी. माणिकलाल ॲण्ड कंपनी फर्मचे मालक ओमप्रकाश माणिकचंद परदेशी (वय ८३) यांचे ३ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. ४ ऑगस्ट रोजी त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## विजयकुमार कटारिया यांचे निधन



नगर - येथील विजयकुमार उत्तमचंद कटारिया (भानसहिवरावाला) (वय ७१, रा.धनश्री रो.हौसिंग, चिपाडे मळा, केडगाव देवी रोड, अ.नगर) यांचे ४ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांचे इच्छेनुसार त्यांचे देहदान करण्यात आले.

त्यांच्या पश्चात सौ. प्रिती गुंदेचा, सतीश उर्फ लालचंद, उमेश, धीरज कटारिया यांचे ते वडील होत. आर्यन, आगम कटारिया यांचे आजोबा होत. ते जुना बाजार येथील कटारिया एजन्सीचे संचालक होते.

## स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.आशा बडवे यांचे निधन



नगर - नगरमधील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. आशा अविनाश बडवे (वय ९०) यांचे २८ जुलै रोजी इंदूर येथे अल्पशा आजाराने निधन झाले.

सन २०२० पासून त्या इंदूर येथे त्यांच्या मुलीजवळ होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## विठ्ठलराव कळमकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील विठ्ठलराव कोंडिबा कळमकर गुरुजी उर्फ आण्णा (वय ९३) यांचे ४ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ५ ऑगस्ट रोजी चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.ज्येष्ठ साहित्यिक वक्ते डॉ. संजय कळमकर यांचे ते वडिल होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## आनंद शिंगारे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील आनंद मधुकर शिंगारे (वय ५२) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, चुलत बंधू, जावई, नातु असा परिवार आहे.

श्रीराम मंदिर चौकातील भांड्यांचे व्यापारी मधुकर चिंतामण शिंगारे यांचे चिरंजीव, चि.ओम शिंगारे यांचे वडील, कुंदन, शेखर व चि.रोहन शिंगारे यांचे चुलत बंधू होत.

## श्रीमती सुशिलाबाई शेलार यांचे निधन



पुणे - येथील गणेशवाडी, बी.एम.सी.सी कॉलेज रोड, डेक्कन जिमखाना येथील रहिवासी वारकरी सांप्रदायाच्या अनुयायी व दरवर्षी आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणाऱ्या श्रीमती सुशिलाबाई व्यंकटराव शेलार (वय ८९) यांचे २७ जुलै रोजी दु:खद निधन झाले आहे.

त्यांचे पती कै. व्यंकटराव माधवराव शेलार हे पोलिस अधिकारी होते. तसेच अहमदनगर जिल्ह्याचे माजी आमदार कै. बाळासाहेब नागवडे हे त्यांचे ज्येष्ठ बंधू होते. तसेच डेक्कन जिमखाना / पी.वाय.सी क्लबचे पदाधिकारी कल्याणराव व्यंकटराव शेलार व एफ.सी रोड, पुणे येथील सुदर्शन मित्र मंडळाचे पदाधिकारी रणजित व्यंकटराव शेलार तसेच अहमदनगर शहर येथील हॉटेल व्यावसायिक राजन व सारंग व्यंकटराव शेलार हे त्यांचे पुत्र आहेत. तसेच सोलापूर शहर येथील अंबिका हॉस्पिटलच्या डॉक्टर संगीता राजेंद्र भगत व कै. साधना भगवंतराव देशमुख ह्या हेखील त्यांच्या कन्या आहेत. डॉ. सौ.जान्हवी अरविंद मुळे (भगत) आणि डॉ. हर्षद भगत ही त्यांची नातवंडे आहेत. त्याचप्रमाणे पुणे जिल्हा न्यायालय येथे कार्यरत असणाऱ्या ॲड.सौ.बिना रणजित शेलार या त्यांच्या सूनबाई आहेत. ॲड.प्रणव शेलार हे त्यांचे नातू आहेत. श्रीमती सुशिलाबाई व्यंकटराव शेलार यांचा वारकरी सांप्रदायात, पोलिस मित्र परिवारात व पुणे शहरात कार्यरत असणाऱ्या अहमदनगर जिल्हा रहिवासी मित्र मंडळाच्या कार्यामध्ये सहभाग होता.



शहरातील अहमदनगर-कोल्हार-शिर्डी रस्त्यावरील डिएसपी चौक उड्डाणपुल, नागापुर एमआयडीसी जवळील सह्याद्री चौक व सनफार्मा चौक या तीन दुपदरी उड्डाणपुलांच्या कामांचे भुमिपूजन करताना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत आमदार संग्राम जगताप, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर.

## शहरातील ३ उड्डाणपुलांचे भुमिपूजन

नगर - सार्वजनिक बांधकाम विभाग अर्थसंकल्पांतर्गत मंजूर झालेल्या शहरातील अहमदनगर-कोल्हार-शिर्डी रस्त्यावरील डिएसपी चौक उड्डाणपुल, नागापुर एमआयडीसी जवळील सह्याद्री चौक व सनफार्मा चौक या तीन दुपदरी उड्डाणपुलांच्या कामांचे भुमिपूजन, महसूल पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री, तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# टेंडर, वर्क ऑर्डर नसताना उड्डाणपूल कामांचा शुभारंभ केल्याप्रकरणी थेट राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार

### पालकमंत्री, शहराच्या आमदारांचा हिशोब जनता चुकता करेल; जिल्हाधिकारी, झेडपी सीईओंवर कारवाई करा : किरण काळे



नगर - पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते, आ. संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर शहरामध्ये तीन उड्डाणपूलांच्या कामांचा शुभारंभ शनिवारी करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे सीईओ हे देखील उपस्थित होते. सदर उड्डाणपुलाच्या कामांची निविदाच अद्याप पर्यंत प्रकाशित झालेली नाही. त्यामुळे या कामाची कुठलाही वर्क ऑर्डर नाही. असे असतानाही कामाचा शुभारंभ करणे म्हणजे नगरकर जनतेची दिशाभूल करत फसवणूक करणे असल्याचे काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी सांगितले. याबाबत राज्याच्या मुख्य सचिव आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांकडे लेखी पत्राद्वारे तक्रार केली आहे.

किरण काळे यांनी मंत्रालय स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या सा.बां. विभागा अंतर्गत निधी मंजूर झाल्याचे सांगत नगर शहरातील डीएसपी चौक, नागपूर एमआयडीसी जवळील सह्याद्री आणि सन फार्मा चौका जवळ आशा तीन दुपदरी उड्डाण पुलांच्या कामांचा शुभारंभ ३ ऑगस्ट रोजी करण्यात आला. याबाबत तीनही उड्डाण पुलांच्या कामाची निविदा अद्याप पर्यंत प्रकाशित झालेली नाही. सदर काम त्यामुळे कोणालाही ॲलॉट झालेले नाही. तसेच या कामाचा कार्यारंभ आदेश देखील देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

### चौकशी करून कारवाईची मागणी

केवळ सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करत विकास कामे सुरू केल्याचा बनाव या माध्यमातून रचला असल्याचे धक्कादायक आहे. यामध्ये राजकीय व्यक्तींबरोबरच जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यासारख्या आयएएस दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची देखील उपस्थिती आणि सहभाग असणे हे अत्यंत धक्कादायक आहे. त्यामुळे फसवणूक झालेल्या नगरकर जनतेच्या व काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्य शासनाकडे मागणी केली आहे की, अशा पद्धतीने जनतेची दिशाभूल करणाऱ्या कृत्याबद्दल जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी या दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंत्रालय स्तरावरून चौकशी करून योग्य ती कारवाई करावी.

### त्यांच्यावर जनताच कारवाई करेल

किरण काळे म्हणाले की, राहिला प्रश्न पालकमंत्री आणि शहराच्या आमदारांचा. राजकीय जीवनात वावरत असताना जनतेचे लोकप्रतिनिधी म्हणून ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला निवडून दिलेले असते तेव्हा त्यांनी जनतेची अशा पद्धतीने दिशाभूल करणे हे नैतिकदृष्ट्या अत्यंत गैर आहे. यांच्यावर कारवाई आता जनतेच्या न्यायालयात, निवडणुकीच्या रणांगणात जनताच करेल.

### निविदा प्रक्रिया राबवून खऱ्याखुऱ्या कामाचा तातडीने शुभारंभ करा

सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर तीनही उड्डाण पूलांच्या कामांच्या निविदा तातडीने प्रकाशित करून योग्य ते सर्व प्रशासकीय मंजुरीचे सोपस्कार पूर्ण करून, चांगलं रेपुटेशन असणाऱ्या कंत्राटदारालाच हे काम जाईल याबाबतची सर्वतोपरी खबरदारी घेत लवकरात लवकर प्रत्यक्ष खऱ्यखुऱ्या कामाला सुरुवात करावी आणि जनतेच्या पैशाचा अपव्यय शासनाच्या माध्यमातून होणार नाही, काम निकृष्ट दर्जाचे होणार नाही, यात दमडीचा ही भ्रष्टाचार होणार नाही याबद्दलची योग्य ती काळजी प्रशासनाच्या वरिष्ठ स्तरावरून घेण्यात यावी अशी मागणी किरण काळे यांनी राज्याच्या मुख्य सचिवांकडे केले आहे.

### मागील निवडणुकीत देखील असेच चुनावी जुमले राबविले गेले

किरण काळे यांनी शुभारंभ झालेल्या कार्यक्रम स्थळावरून फेसबुक लाईव्ह करत नेटकऱ्यांसमोर या विषयाला वाचा फोडली. यावेळी काळे म्हणाले की, मागील विधानसभा निवडणुकीमध्ये देखील शहराच्या आमदारांनी आयटी पार्क उभारत शहरातील हजारो तरुणांना रोजगार देत असल्याचा बनाव रचला होता. त्याचा भांडा फोड आम्ही केला. आता या निवडणुकीच्या तोंडावर देखील उड्डाणपूलांच्या बाबतीत अशाच प्रकारे दिशाभूल करत जनतेला भुलविण्याचे काम सुरू आहे. मात्र नगरकर अशा गोष्टींना भूलणार नाहीत असे काळे यांनी म्हटले आहे.



### शहरातील उड्डाणपुलावर खड्डे पॅचिंगचे काम सुरु

नगर येथील उड्डाणपुलावरील खड्डे बुजवण्याचे व पॅचिंगचे काम ठेकेदाराकडून सुरु करण्यात आले आहे. (छाया - लोकेश बर्वे)

## 'ना वर्क ऑर्डर', 'ना टेंडर' तरी डी. एस. पी. चौक, सह्याद्री चौकातील उड्डाणपुलांच्या कामाचे भुमिपूजन

### नागरिकांना फसविण्याचा प्रयत्न : माजी नगरसेवक योगिराज गाडे



नगर - सत्ताधारी यांच्या प्रयत्नातून डी.एस.पी. चौक (रु.७१ कोटी) व सह्याद्री चौक (रु.५१ कोटी) येथील उड्डाणपुलांच्या बांधकामासाठी भुमिपूजन करण्यात आले. परंतु वास्तविकता अशी आहे की या कामासाठी अद्याप कोणतीही वर्क ऑर्डर जारी नसताना व कोणतेही टेंडरदेखील निघालेले नाही, असे माजी नगरसेवक योगिराज गाडे यांनी म्हटले आहे.

कायद्याने, वर्क ऑर्डर आणि टेंडर निघाल्याशिवाय कोणत्याही बांधकामाचे उद्घाटन समारंभ करणे अवैध आहे व जनतेची दिशाभूल करण्याचा प्रकार आहे. या गोष्टीचा कडक निषेध करतो आणि संबंधित प्राधिकरणांनी त्वरित या बाबींची दखल घ्यावी, अशी मागणी करतो. जनतेला खोटी आश्वासने देणे आणि दिशाभूल करणे हा विरोधकांचा प्रपंच आहे. जनतेची दिशाभूल करणे योग्य आहे का ? असा सवाल योगिराज गाडे यांनी केला आहे. नगरकरांची ही दिशाभूल आहे या कार्यक्रमास स्वत: जिल्हाधिकारी हजर होते आम्ही आमच्या प्रभागातील विविध कामे वर्क आर्डर पेडींग असताना उदघाटन केल्यास जिल्हाधिकारी या कार्यक्रमास येतील का? अशी विचारणा केली.

## हौदात पडून ३ वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू



नगर - नगर शहरातील ३ वर्षीय बालकाचा रस्त्याच्या कडेला असलेल्या पाण्याच्या हौदात पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.४) सायंकाळी घडली आहे. समर इम्रान शेख (रा. इस्लामिया बेकरी जवळ, मुकुंदनगर) असे मयत बालकाचे नाव आहे. तो हौदात पडतानाची घटना परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाली आहे.

मुकुंदनगर परिसरामध्ये रविवारी सायंकाळच्या सुमारास समर शेख हा कॉलनीत खेळत होता. तेव्हा शेजारी असलेल्या शादाब किराणा स्टोअर या दुकानाच्या समोर असलेल्या पाण्याच्या हौदामध्ये तो पडला. तो हौदात पडला त्यावेळी त्याला कोणीही पाहिले नव्हते. बराच वेळ झाला तरी मुलगा घरी न आल्याने त्याच्या कुटुंबीयांनी त्याचा बराच वेळ सर्वत्र शोध घेतला. मात्र तो सापडला नाही. बऱ्याच वेळाने काहींचे लक्ष पाण्याच्या हौदाकडे गेल्यावर त्या ठिकाणी तो त्या हौदात पडल्याचे आढळून आले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर तत्काळ भिंगार कॅम्प पोलिसांना व महापालिकेच्या अग्निशामक दलाला याची माहिती देण्यात आली. पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि पाण्यात बुडालेल्या त्या चिमुकल्याला बाहेर काढले. त्याचे वडील इम्रान शेख यांनी त्यास बेशुद्धावस्थेत उपचारासाठी सायंकाळी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. बटूळे यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे.

## मनपाचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांची अखेर नेमणूक

नगर - महापालिकेच्या मार्केट विभागाकडील रस्ता बाजू फी, गाळे, खुल्या जागा, टांचण रजिस्टरला गाळेधारकांची नोंद न घेणे, शाळा खोल्या हस्तांतरण प्रकरणी फी भरून न घेणे, आर्थिक नुकसानीबाबत मुदतीत प्रस्ताव सादर न करणे, गाळ्यांच्या भाडेवाढीचा प्रस्ताव सादर न करणे, चौकशी अधिकारी नेमण्यास दिरंगाई करणे याबाबत आर. एस. वखारे यांनी केलेल्या तक्रारीची आयुक्त यशवंत डांगे यांनी दखल घेत या सर्व प्रकरणाच्या चौकशीसाठी उपायुक्त (सा.) लक्ष्मीकांत साताळकर यांची नियुक्ती केली आहे. महापालिकेचे २ ते ३ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी मनपाच्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी वखारे यांनी केली होती. त्यानुसार १ ऑगस्ट रोजी आयुक्त डांगे यांनी वखारे यांच्या तक्रारीच्या अनुशंगाने प्राथमिक चौकशी तात्काळ पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश उपायुक्त साताळकर यांनी दिले आहेत, अशी माहिती वखारे यांनी दिली आहे.

## लक्ष्मीबाई पगारे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील लक्ष्मीबाई वेडू पगारे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सहा मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. बांधकाम व्यवसायिक सुभाष पगारे व चार्टर्ड अकाउंटंट संजय पगारे यांच्या मातोश्री होत.

## मुरलीधर वधवाणी यांचे ह्रदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील गळनिंब विकास सोसायटीचे स्वस्त धान्य दुकानदार, सिंधी समाजाचे सेवादार मुरलीधर पमनदास वधवाणी (वय ६७) यांचे ह्रदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

स्व.अशोक वधवाणी व स्व.भागचंद वधवाणी यांचे ते बंधू, वासुदेव, लक्ष्मण व राजन वधवाणी (सर) यांचे थोरले बंधू, विनोद वधवाणी व ठाकुर वधवाणी यांचे वडील होत.

## दिल्लीगेट परिसरात दोन गटांत सशस्त्र हाणामारी; परस्परविरोधी फिर्यादीवरून चौघांवर गुन्हा दाखल

नगर - येथील दिल्लीगेट परिसरात नीलक्रांती चौकाजवळ असलेल्या पान टपरीवर किरकोळ वादातून सशस्त्र हाणामारी झाल्याची घटना शनिवारी (दि.३) रात्री उशिरा घडली. यात तिघे जखमी झाले आहेत. या प्रकरणी दोघांनी दिलेल्या परस्परविरोधी फिर्यादीवरून चौघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, घटनेनंतर रात्री उशिरापर्यंत या चौकात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

हर्षद अशोक भोसले (वय २६, रा. निलक्रांती चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरज साळवे (रा. सर्जेपुरा) व सनी काते (रा. सावेडी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मित्र कश्यप साळवे सोबत कॅफे किंग समोरील हनुमान पान टपरीसमोर मावा घेत असताना बाजूला सरक असे म्हटल्याचा राग आल्याने दोघांनी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. जिवे मारण्याचे उद्देशाने धारदार शस्त्राने वार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

सनी अनिल काते (वय २४, रा. सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हर्षद अशोक भोसले, कश्यप साळवे (दोघे रा. निलक्रांती चौक) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरज हरिभाऊ साळवे (वय २४) याच्या समवेत निलक्रांती चौकात हनुमान पान स्टॉल येथे पान खाण्यास गेले असताना दोघांनी शिवीगाळ करून आम्हा दोघांवर धारदार वस्तूने छातीवर, पोटावर, दंडावर वार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# नगर शहरासह उपनगरात चाललंय काय?

(पान १ वरून)

तसेच चोऱ्या-घरफोड्या करणाऱ्या चोरट्यांनी जो उच्छाद घातला आहे, त्याचे काय? या चोरट्यांचा पोलिस यंत्रणा शोध घेणार कधी? असा प्रश्न शहरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### या चोरट्यांच्या बिमोडासाठी विशेष पथक नेमण्याची आवश्यकता

नगर शहर परिसरात मागे काही वर्षांपूर्वी चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांनी असाच उच्छाद घातला होता. त्यावेळी तत्कालीन पोलिस अधिक्षक मनोज पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखा, तोफखाना, कोतवाली पोलिस ठाण्यातील काही निवडक पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांचे विशेष पथक नेमले होते. या पथकाने त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस निरीक्षक अनिल कटके यांच्या नेतृत्वाखाली चेन स्नॅचिंगच्या दाखल झालेल्या गुन्ह्यापैकी ३६ गुन्हे उघडकीस आणून २५ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचेकडून एकुण २९ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल त्यात सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली वाहने जप्त केली होती. तशाच पद्धतीने पुन्हा एकदा चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांना पकडण्यासाठी विशेष पथक नेमण्याची आवश्यकता आहे. असे केल्यास या चोरट्यांचा बिमोड करणे शक्य होणार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### डायबिटीज रुग्णांसाठी फायदेशीर

ज्यांना शुगरचा त्रास असतो त्यांनी कच्च्या पपईचे सेवन करून रक्तात शर्कराच्या मात्रेला कमी करू शकता. यामुळे शरीरात इंसुलिनची मात्रा वाढते.

पपई पोटाशी निगडित समस्या दूर करते आणि शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढते. मात्र गर्भवती महिलेस पपई खायला देऊ नये.

## पाककला

### शाही खिचडी

**साहित्य** – ३ वाट्या दिल्ली राईस, दीड वाटी मुगाची डाळ, १ बटाट्याचे मध्यम काप, हिंग, हळद, १ वाटी मटार दाणे, २ कांदे, २ इंच आलं, तूप, १५–२० लसूण पाकळ्या, मिरच्या, दही, थोडे काजू, बदाम, बेदाणे, जिरे, मीठ, गरम मसाला आणि सुक्या मिरच्या.

**कृती** – खिचडी करण्याच्या आधी १ तास अगोदर डाळ व तांदूळ एकत्र करून धुवून ठेवावे. कांदे उभे पातळ चिरावे. पातेल्यात तूप तापवून काजू, बदाम, बेदाणे तळून घ्यावे. त्याच तुपात कांदा तळून घ्यावा. कांदा लालसर कुरकुरीत तळावा. आलं–लसणाची पेस्ट करावी. पातेल्यात तूप तापवून हिंग, जिरे, हळद, सुक्या मिरच्या आणि आलं–लसूण पेस्ट घालून हे सर्व जिन्नस परतावे. त्यात डाळ, तांदूळ, बटाटे, मटार दाणे टाकावेत. ते चांगले परतून तांदळाच्या दुप्पट पाणी घालावे. चवीनुसार त्यात मीठ, गरम मसाला घालून मंद आचेवर खिचडी शिजू द्यावी. खिचडी वाढताना ती गरमागरमच वाढावी.

## सौंदर्य

### केसांना चमक येण्यासाठी

स्नान करताना केसांत थोडेसे व्हिनेगर टाका व त्वरित धुवा. यामुळे केसांना चमक येईल आणि केसांचा रंग जास्त गडद होईल.

## सल्ला

स्नान करण्यापूर्वी पाण्यात काही थेंब लिंबाचा रस टाकून घ्या.

## वास्तू

आपल्या घराच्या दरवाजावर शुभचिन्हे म्हणजे स्वस्तिक, ॐ, गणपती, कुबेर यांची चित्रे लावावी. त्यामुळे बाहेरील अमानवी शक्तींपासून वास्तूसहीत सर्व कुटुंबियांचे रक्षण होते.

देवघरात तुटक्या–फुटक्या वस्तू ठेवू नयेत. देवघराच्या वरती–खाली काहीही सामान ठेवू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. ६ ऑगस्ट २०२४**

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष**
**मघा १७।४४, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**वृषभ** : व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल.

**मिथुन** : मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. कामे मार्गी लावू शकाल.

**कर्क** : महत्त्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे. तांत्रिक वस्तू व वाहने जपून वापरावीत.

**सिंह** : वैवाहिक सौख्य लाभेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. बाहेरचे जेवण बाधक ठरेल.

**कन्या** : आजचा दिवस फायदेशीर ठरेल. आरोग्याकडे विशेष लक्ष द्याल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**तूळ** : जुने मित्र व नातेवाईक भेटतील. वाहन चोरी होणे शक्य.

**वृश्चिक** : तुमच्या राहत्या जागेचे किंवा प्रॉपर्टीच्या जागेचे प्रश्न सोडवू शकाल.

**धनु** : हाती घेतलेल्या कामात यश मिळवाल. जिद्द व चिकाटी वाढेल.

**मकर** : प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. व्यवसायातील आर्थिक गुंतवणूक फायदेशीर.

**कुंभ** : रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**मीन** : शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल.


**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**आई :** बंड्या आज काय शिकवले शाळेत.
**बंड्या :** लिहायला शिकवले.
**आई :** अरे वा छान! काय लिहिले?
**बंड्या :** काय माहीत? अजून वाचायला नाही शिकवले...

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता


(मूळ इंग्रजीत)



हे विश्व म्हणजे सदोदित बदलणाऱ्या
फेसासारखे आहे मौनाच्या समुद्र पृष्ठावर
ते नेहमी तरंगत असते

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ६९८२ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ६९८१ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | म | ल | ब | जा | व | णी | ■ |
| दा | त | ■ | त्ता | ■ | ही | ■ | च |
| ज | ल | द | ■ | आ | म | दा | र |
| ■ | ब | र | क | त | ■ | स | ण |
| आ | ■ | व | र | ■ | वा | न | र |
| ग | व | ळ | ण | ■ | सा | व | ज |
| म | ■ | ■ | ■ | आ | ■ | मी | ■ |
| न | ज | रा | न | ज | र | ■ | मे |

**आडवे शब्द :–** १) सहा ऋतूंपैकी एक ४) पुष्कळ; खूप ७) पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध शहर ८) धागा; तंतू; दोरा ९) तांबडी फुले येणारा एक वृक्ष ११) डाव्या हाताने काम करणारा १३) तबल्याचा जोडीदार १४) थोडीशी भीती; शंका १७) वायू; वात १९) माला; बरोबरी; तुलना; हार २०) मोठा सरदार २२) चोप; ताडन २३) प्रमाण; प्रमाणपत्र; पुरावा २४) सायंकाळ; संध्याकाळ २५) शक्ती; व्यायामाचा एक प्रकार

**उभे शब्द :–** १) अंगीकारलेले व्रत २) रागाचा आवेश; अतिराग ३) ओझे वाहणारा पूर्वीचा एक गावकामगार ४) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी ५) अपुरा; पूर्ण ६) एक प्रकारचे भांडे १०) पक्का बांधलेला रस्ता १२) बिन थाटामाटाचा; अनलंकृत १५) सर्कशीतील वगैरे शरीराच्या विशिष्ट हालचाली १६) अग्नीतून निघणारा काळसर वायू १७) आक्रमण; हल्ला १८) वेगाने वाहणारी हवा २०) कुटण्यासाठीचा दगडाचा खळगा २१) लाकडाचे वगैरे संग्रहालय; गोदाम २२) केशवर्धक तेल देणारी एक वनस्पती २३) जनावर ज्याला बांधतात ती दोरी

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : बुद्धी असणाऱ्यांजवळ सर्व काही असते; परंतु मूर्खाजवळ सर्व असूनही काहीच नसते. – **तिरुवल्लुवर**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### पती–पत्नीचा रक्तगट एक असेल तर मुले व्हायला काही प्रॉब्लेम येतो का?

आपल्याकडे पत्रिका बघून एक नाडी असेल तर लग्नाला मनाई करतात. आणि त्यात किती तथ्य आहे आणि ही बाब वैज्ञानिक दृष्टीने किती बरोबर आहे याबद्दल मी काही सांगू शकत नाही. त्या बाबतीत तथ्यपूर्ण माहिती वाचायला आवडेल. मात्र ही समजूत आहे. मात्र यावर पण तोडगे अनेक ज्योतिषी सांगतात. एक नाडी आहे तरी अमुक केल्याने चालते वगैरे वगैरे. आपल्याकडे एक गोत्र असेल तर सहसा लग्न नाही करत. पण कारण एक गोत्र असेल तर एकाच पुरुषापासून व्युत्पत्ती झालेले आहे असे मानले जाते आणि मग ते बहीण भाऊ असे काहीसे नाते समजतात. पण वैज्ञानिक दृष्टीने साधारण ७ पिढ्या गेल्या की गुणसूत्रे बदलून जातात. त्यामुळे मूळ पुरुष एक असला तरी वेगवेगळ्या मूळ स्त्रिया त्यात सामील झाल्याने आणि स्त्रिया आपल्या अपत्यांना आपले mitochondrial DN देत असल्याने तो दोष ही नाहीसा होतो. अर्थात आपल्याकडे सगोत्री विवाह करतात, मुलीला मामाच्या मांडीवर देऊन. म्हणाजे आपल्या आईच्या गोत्रात जाऊन. अर्थात अर्धी आणि सुतभर अधिक ती मुलगी आईच्या गोत्रचीच असते ही बाब गौण समजून दुर्लक्ष करतात.

मात्र एक रक्त गट असेल तर काहीही फरक पडत नाही. मुले होण्यास काहीच अडचण नाही. अपत्याचा रक्त गट बहुतेक तोच राहील. रक्त गट आणि मुले होणे यांचा काहीच संबंध नाही. अर्थात, B, O आणि B हे रक्तगट. हे काहीही असू शकतात. पण Rh फॅक्टर हा एक मुद्दा महत्वाचा ठरतो. जर वडील Rh positive आणि आई Rh negative असेल आणि जर होणारे अपत्य Rh positive झाले तर पोटात असताना बाळाच्या रक्तातील Rh फॅक्टरच्या विरोधात आईच्या शरीरात antibodies निर्माण होतात. आणि मग दोघांच्याही आयुष्याला धोका निर्माण होऊ शकतो. जुन्या काळी जेव्हा हे माहीत नव्हते तेव्हा मुलींना खूप धोका असायचा. पण आजकाल रक्त तपासणी करून त्यासाठी औषध योजना करून हा धोका टाळता येतो. मात्र त्यासाठी आईचे रक्त तपासणे गरजेचे आहे.

जर ती स्वतः Rh positive असेल तर बाळ Rh negative चालते. फक्त आई negative असेल तर काळजी घ्यावी लागते. मग वडलांचे रक्त तपासण्यात येते. जर आई B + असेल, तर वडील B, B, की O + की काहीच फरक पडत नाही. पण आई B - असेल तर वडलांचा Rh factor तपासावा लागेल.

## कोंबड्याची भूपाळी

एका कोंबड्याची आणि कुत्र्याची चांगली मैत्री होती. ते नेहमी बरोबर हिंडत–फिरत. एकदा परदेशात फिरायला जावे, असे वाटल्याने ते दोघे प्रवासाला निघाले. वाटेतल्या गमती जमती पाहत त्यांचा प्रवास सुखाने चालला होता. रात्र पडताच त्यांनी एके ठिकाणी मुक्काम केला. कोंबडा एका झाडावर चढून बसला, तर कुत्रा झाडाच्या बुंध्याला डोके ठेवून झोपी गेला. पहाटे जाग येताच कोंबडा नित्याच्या सवयीप्रमाणे बांग देऊन ओरडू लागला.

हा आवाज एका कोल्ह्याने ऐकला. त्याला वाटले,

''चला, आज, या कोंबड्याचीच मेजवानी झोडावी.''

असा विचार करीत तो कोंबडा बसलेल्या झाडाजवळ येत म्हणाला,

''काय कोंबडेभाऊ, किती चांगला आहे तुमचा आवाज. किती छान गाता तुम्ही. तुमची भूपाळी ऐकून मला देव भेटल्याचा आनंद झाला. तेव्हा तुमच्या पायांना हात लावून तुम्हाला नमस्कार करावा, असे मला वाटते.'' तर कोल्ह्याची लबाडी ओळखून कोंबडा बसल्या जागेवरुन म्हणाला,

''कोल्हेदादा, खाली आमचा पुजारी झोपलाय. त्याला जागे करुन दार उघडायला सांगून आत या.''

तेव्हा कोल्ह्याला ते खरेच वाटले. तो कुत्र्याजवळ गेला आणि त्याला हलवून जागे करु लागला. जागा होताच समोर कोल्ह्याला पाहून कुत्र्याने झडप घालीतच त्याचे नरडे फोडून त्याला ठार केले.

**तात्पर्य** : सामान्य लोकही कधी कधी लबाड लोकांना धडा शिकवितात.

## जीवन चक्र



अखंड में आत्मायें पूर्ण चेतनता की अवस्था में थीं, हर प्रकार के जावरण से मुक्त थीं। जैसे–जैसे वे नीचे के मंडलों में प्रवेश करती चली गई उसी मंडल के मुताबिक आवरण (परदे) उन पर चढ़ते चले गये । इस प्रकार सबसे निचले मंडल अर्थात भौतिक मंडल में इन आत्माओं ने भौतिक चोला धारण कर लिया है। युगों–युगों से आत्मा, जिस चोले में वास करती है या जिस मंडल में वास करती है, उसी से जाना जाती है। दुर्भाग्यवश आत्मा अपनी असलियत को भूल चुकी है। जब हम इस संसार को एक बहुत ऊँचे नजरिये से देखते हैं, तो पाते हैं कि करोड़ों आत्मायें इस जगत को अपनी ज्योति से रोशन कर रही हैं। एक उफनते समुद्र की भांति, ये आत्माएँ एक चोले से दूसरे चोले में प्रवेश करती हैं, एक जीवन को छोड़कर दूसरे जीवन में वास करने लगती हैं। सभी आत्माएँ अपने मूल रूप से एक ही हैं; सब उस परमात्मा की अंश हैं, उस प्रभु की ज्योति हैं और सबमें मालिक का प्यार वास करता और सब आनंद से भरपूर हैं। पर जब हम इस भौतिक संसार को देखते हैं, तब हम हर प्राणी को दुःखी देखकर भयभीत और दुःखी होते हैं। हम सारे ससार में आपसी मतभेद और कलह देखते हैं। देश एक दूसरे से लड़ रहे हैं। बहुत से देश अपने आंतरिक झगड़ों में उलझे हुए हैं। हम देखते हैं, धार्मिक लोगों में भी आपसी मतभेद हैं। साम्प्रदायिक झगड़े हर जगह व्याप्त हैं। हमारे परिवारों में भी असमानता और कलह का बोलबाला है। हम देखते हैं, इंसान दूसरे प्राणियों (जीव–जंतुओं) और इंसानों को भी मार रहा है। बड़ी हैरानी की बात है कि इंसान कैसे यह सब उपद्रव कर सकता है या कैसे किसी को दुःख पहुँचा सकता है, जबकि वही प्रभु की ताकत सब इंसानों में काम कर रही है? प्रभु ने एक से अनेक हो जाने का निश्चय इसलिए किया, ताकि उसकी (प्रभु) खुशी या सत्ता को बढ़ाया जा सके। जैसे एक विवाहित जोड़ा (पति–पत्नी) अपने बच्चों के जरिये अपने प्यार और खुशी को बढ़ाता है, उसी प्रकार प्रभु ने सृष्टि को पैदा करके अपनी आत्माओं, अपने बच्चों द्वारा अपने प्यार और खुशी को बढ़ाना चाहा। पर फल आशा के अनुरूप नहीं निकला । हम सब, जो कि आनन्द एवं चेतनता की जीवित प्रतिमायें हैं, घोर दुःख–दर्द सह रहे हैं।

**आत्मिक एकता की खोज**

अगर हम अपनी असली हालत को पहचानें और यह जानें कि हम आत्मा हैं, तो हम हमेशा की शांति और खुशी पा जायेंगे । जब हम भौतिक देह (शरीर) और मन से ऊपर उठकर, अंतर की गहराइयों में जाते हैं, तो वहाँ हमारी आत्मा हमेशा की शांति और खुशी के स्रोत को पा लेगी। इस सुखद अवस्था से गुजरने के बाद हम उस आत्मिक एकता के रहस्य को जान लेंगे, जो इस सृष्टि का आधार है।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

अगर जीवन में स्नेह नहीं तो समझो अभी समाधि अधूरी है। तुम मेरा यह काम करोगे तो मैं तुम्हें पसंद करूँगा वरना हमारा रिश्ता खत्म। यह प्रेम की सुगंध को दुर्गंध में बदल देता है। प्रेम वासना में बदल जाता है। प्रेम की ताकत कमजोरी बन जाती है। मन पुरानी बातों में अटका रहता है, लेकिन समय नहीं अटकता तथा समय के साथ रिश्ते भी बदलते रहते हैं। नये रिश्तों में बहुत प्यार होता है, लेकिन जैसे ही सामने वाले ने हमारे मन मुताबिक काम नहीं किया या बर्ताव नहीं किया तो प्रेम गायब हो जाता है। ऐसी स्थिति में भी हमारा प्रेम उसके प्रति बना रहे हमें समाधि जैसी अनुभूति होगी। कई बार लोग कहने के लिये हाँ कह देते हैं कि हाँ मुझे फलानी बात पर पूरा विश्वास है लेकिन वास्तव में विश्वास होता नहीं है। ईश्वर कल्याणकारी है यह हम विश्वास करते हैं परंतु जब कोई परिस्थिति आती है तो हम ईश्वर को दोष देने लगते हैं तब हमारा विश्वास सिर्फ कहने मात्र होता है अंदर से संशय आने लगता है। अगर परिणाम हमारी सोच अनुसार हो तो विश्वास पक्का अगर नहीं हो संशय। ऐसे लोग समाधि में ऊँच नहीं जा सकते।

**मानसिक शक्ति–संकल्प–१**

एक बंद कमरे में बैठा उच्च स्तरीय चिंतक या योगी अपने विचारों से सारी दुनिया को हिला सकता है। सूक्ष्म जगत को आन्दोलित कर सकता है तथा दुर्भावनाओं को सद्भावना भरे वातावरण में बदल सकता है। अरविंद योगी ने भारत को स्वतंत्र कराने के लिये योग से सूक्ष्म वातावरण तैयार किया। संसार में सद्भाव का वातावरण बने उसके लिये स्थूल प्रयास पर्याप्त नहीं, सूक्ष्म स्तर पर पुरुषार्थ करना होगा। याद रहे श्रेष्ठ समाज का निर्माण श्रेष्ठ विचारी सहा होगा। पृथ्वी की चुम्बकीय शक्ति हर वस्तु को नीचे की ओर खींचती है। पानी भी बिना प्रभाव के नीचे की ओर बहता है। दुष्टता की प्रकृति भी मनुष्य को गिराती ही है। जब को उठाने के लिये बहुत जप करना पड़ता है। दुष्टता से परेशान लोग नशा करत इससे भी चैन नहीं पड़ता। संसार व्यवस्था में कुछ आगे–पीछे हो सकता है पर अपना हन्टर सदा संभाले ही रहती है, नहीं तो इतने बड़े संसार को कैसे सुनियोजित बाहरी वस्तुओं के बारे में मनुष्य को बहुत जानकारी है। उनसे क्या लाभ है क्या लाग नशा करते देखे गये हैं। सकता है परंतु प्रकृति तो का कसे सुनियोजित किया जाये। लाभ है क्या हानि है। सब जानता है। मनुष्य में खुद में कितनी शक्ति है वह नहीं जानता। शरीर के भिन्न–भिन्न अंगों को चलाने में इतनी बिजली खर्च हो जाती है, जितनी बिजली किसी बड़े कारखाने को चलाने में खर्च होती है। एक बहन घरेलू काम काज करने में जितनी शरीर की शक्ति खर्च कर लेती है वह उतनी होती है कि उसके बल से पूरी धरती की कई फैक्टरियां चलाई जा सकती हैं। हृदय, पेट, गुर्दे आदि के चलने में जितनी शक्ति खर्च होती है, वह असल में बहुत ज्यादा होती है, जितनी कि जानकरी है। अपने सम्बन्ध से जितना समझा गया है उसे पर्वत की तुलना में अणु मात्र ही कहा जायेगा। मानसिक शक्ति के बारे में भी बहुत कम कहा गया है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

### मध

विविध प्रकारच्या फुलांमधून मधुर रस शोषून मधमाश्या आपल्या लहान शरीरात त्याचा साठा करून मधाच्या पोळ्यामध्ये असणाऱ्या लहान लहान कोषात त्या तो रस साठवतात व त्या रसालाच मध असे म्हणतात. मराठीमध्ये 'मध', इंग्रजीमध्ये 'हनी', संस्कृतमध्ये 'मधु', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'हनी' या नावाने मध परिचित आहे. मधमाश्यांनी मध निर्माण करून मनुष्यासाठी एक देणगीच दिलेली आहे. मधामध्ये अनेक पौष्टिक व औषधी गुणधर्म आहेत. मध हा अर्धपारदर्शक, अर्धप्रवाही, सोनेरी लालसर रंगाचा, गोड व काहीसा तुरट चवीचा सुगंधी पदार्थ आहे. मधमाश्या इमारतीमध्ये, झाडांवर, झुडुपावर, पर्वतावर मधमाश्याचे मोहोळ तयार करतात. मधमाश्या आहार म्हणून मधाचा उपयोग करतात. त्यांचा खाऊन उरलेला मध हा आपल्याला मिळतो. भारतात काश्मीर, गुजरात, म्हैसूर, हिमालय, महाराष्ट्र या भागात मध जास्त प्रमाणात मिळतो.

**औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार** : मध हा बुद्धी व स्मृती वाढविणारा आहे.

**मधु शीतं लघु स्वादु रूक्षं स्वर्यं च ग्राहकम् ।**
**चक्षुष्य लेखनं चाग्निदीपकं व्रणशोधकम् ।।**
**नाडीशुद्धिकरं सूक्ष्मं रोपणं मृदू वर्णकृत् ।**
**मेधाकरं च विशदं वृष्यं रुचिकर मतम् ।।**
**निघंटु रत्नाकर**

मध हा चवीला गोड, शीत वीर्याचा लघु व रूक्ष असून, लेखनकार्य करणारा आहे. झालेल्या जखमेची स्वच्छता करून नाडीव्रणाची शुद्धी करणारा आहे. तसेच डोळ्यांना भरून काढणारा, त्याच्या सूक्ष्म गुणाने शरीरातील सर्व स्रोतसांमध्ये प्रवेश करणारे, भूक वाढविणारा, बुद्धी व स्मृतिवर्धक व रुचकर आहे.

**याचे आठ प्रकार सांगितलेले आहेत –**

१) माक्षिक, २) भ्रामर, ३) क्षौद्र, ४) पौर ६) आर्थ्य, ७) औद्दालक, ८) दाल हे आठ प्रकार होत. हे सर्व प्रकार मध गोळा करण्याच्या मधमाश्यांच्या नावावरुन दिलेले आहेत.

**आधुनिक शास्त्रानुसार** : मधामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, 'क' जीवनसत्त्व, थोड्या प्रमाणात 'ब' जीवनसत्त्व, आर्द्रता, प्रथिने, खनिजे, पिष्टमय पदार्थ असे अनेक औषधी घटक आहेत. तसेच संशोधनामध्ये असे सिद्ध झाले आहे, की मधातील परागांमुळे त्यात सर्वच्या सर्व ॲमिनो ॲसिड्स, खनिजे, एन्झाईम्स, मेदाम्ले व पिष्टमय पदार्थ असतात. परंतु हे सर्व घटक मध न उकळता घेतल्यासच मिळतात. मध उकळल्याने त्यातील औषधी गुणधर्म कमी होतात. मधामध्ये ग्लुकोज, फ्रुक्टोज व सुक्रोज या नैसर्गिक साखरी असतात.

**उपयोग :**

१) मध आणि आल्याचा रस प्रत्येकी एक–एक चमचा एकत्र करून सकाळ–संध्याकाळ घेतल्यास सर्दी कमी होते, तसेच जाठरअग्नी प्रदीप्त होऊन भूक चांगली लागते.

२) एक चमचा मध, एक चमचा आडुळसा रस व अर्धा चमचा आल्याचा रस एकत्र करून प्यायल्याने खोकला बरा होतो.

(क्रमशः)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# दैदिप्यमान इतिहासापासून प्रेरणा घेवून व नव्या प्रणालीची कास धरून वकिलांनी व न्यायधीशांनी न्याय प्रक्रियेत योगदान द्यावे

## मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विभा कंकणवाडी यांचे प्रतिपादन; जिल्हा न्यायालयाची द्विशताब्दी वर्षपूर्ती उत्साहात


जिल्हा न्यायालयाच्या द्विशताब्दी वर्षपूर्ती कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विभा कंकणवाडी.

नगर – न्याय व्यवस्थेकडे सामान्य माणूस आशेच्या दृष्टीने बघत आहे. त्यामुळे लोकशाहीचा हा आधारस्तंभ अधिक भक्कम व वृद्धींगत व्हावा यासाठी दैदिप्यमान इतिहासापासून प्रेरणा घेवून व नव्या प्रणालीची कास धरून वकिलांनी व न्यायाधीशांनी न्याय प्रक्रियेत योगदान द्यावे. नगर जिल्हा न्यायालयाचा २०० वर्षांचा इतिहास हा दैदिप्यमान आहे. त्यामुळे या जिल्ह्याचे न्याय व्यवस्थेत मोठे योगदान आहे. जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत. त्यामुळे हा दैदिप्यमान इतिहास कधीही विसरू नका. या भूमीने अनेक चांगले वकील, न्यायाधीश व न्यायमूर्तीही दिले आहेत. त्यामुळे हा दैदिप्यमान इतिहास सर्वांनी जपत पुढे न्यावा, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती विभा कंकणवाडी यांनी केले.

नगरच्या जिल्हा न्यायालयाच्या स्थापनेस २०० वर्ष पूर्ण झाले आहे. यानिमित्ताने अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने द्विशतक वर्षपूर्ती निमित्त एका दिमाखदार विशेष कार्यक्रमाचे आयोजन रविवारी केले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती व जिल्ह्याच्या पालक न्यायाधीश विभा कंकणवाडी यांनी दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती व नगरच्या सुपुत्री उर्मिला जोशी फलके, न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा होते.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती एस. के. शिंदे, माजी न्यायमूर्ती सुधाकर देशमुख, महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड.राजेंद्र उमाप, उपाध्यक्ष ॲड.उदय वारुंजीकर, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, ॲड.हर्षद निंबाळकर, ॲड.वसंतराव साळुंके, ॲड. अमोल सावंत, ॲड.जयंत जायभाय, ॲड.सुधाकर आव्हाड, वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.नरेश गुगळे, उपाध्यक्ष ॲड.महेश शेडाळे, सचिव ॲड.संदीप शेळके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सर्व न्यायिक अधिकारी व कर्मचारी तसेच, नगर शहरासह जिल्ह्यातील विविध भागातून वकील उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान जिल्हा न्यायालयाच्या दोनशे वर्षांच्या दैदिप्यमान इतिहासाची ओळख करून देणारा माहितीपट प्रसारित करण्यात आला. तसेच एका विशेष स्मरणिकेचे प्रकाशन न्यायमूर्तींच्या हस्ते करण्यात आले. तसेच नगरमध्ये ४० वर्षांपासून वकिली करणाऱ्या ८० ज्येष्ठ विधीज्ञांचा सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला.

न्यायमूर्ती कंकणवाडी पुढे म्हणाल्या, न्यायदानाच्या प्रक्रियेत वकील महत्वाची भूमिका मांडत असतात. व्यावसायिक दृष्टीकोनातून काम करत अशिलास योग्य न्याय मिळण्यासाठी सहकार्य करत आहात. यासाठी केसचे फौंडेशनने हे भक्कम असेल तरच योग्य न्यायनिवाडा होवू शकतो. तुम्ही आत्मसात कलेल्या कायद्याच्या ज्ञानाचा पूर्ण लाभ आपल्या अशिलास कसा मिळेल याची जबाबदारी वकिलांची आहे. नव्या वकिलांनी अपडेट राहून वरिष्ठांकडून अधिक ज्ञान घेवून नावलौकिक वाढवण्याची अपेक्षा आहे. नावेकायदे येत आहेत. त्यामुळे वरिष्ठ व कनिष्ठांना जुन्या कायद्यासह नव्या कायद्यांची अमलबजावणीसाठी करावी लागणार आहे. त्यामुळे नव्या कायद्यांच्या अभ्यास करण्याशिवाय गत्यांतर नाही ही खूणगाठ सर्वांनी बांधावी. पेपरलेस कामकाजाकडे वाटचाल आता होत आहे. शहरी व ग्रामीण भागातील वकिलांच्या समस्या बार कॉन्सिल सोडवत आहेत. येथे ज्येष्ठ विधिज्ञांचा सन्मान करून त्यांच्या कामाची पावती संयोजकांनी दिली आहे. हा कौतुक सोहळा सुखद व आनंद देणारा आहे.

न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर म्हणाले, दोनशे वर्षांची ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्रमाचा भाग होऊ शकलो याचा मनस्वी आनंद मला होत आहे. येथील ज्येष्ठ विधिज्ञांचा सन्मान करताना खूप आनंद झाला. जिल्हा न्यायालयाने २०० वर्षात बरेच स्थित्यंतर पाहिले आहेत. उत्कृष्ट न्यायव्यवस्था नगरमधून निर्माण झाली आहे. ही न्याय व्यवस्था अजून मजबूत कशी करता येईल हे पहावे लागेल. न्यायप्रविष्टीत प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी चांगले उपाय योजना राबवून न्याय व्यवस्थेवरील ताण कमी करावा, असे आवाहन केले.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी म्हणाल्या, संतांची भूमी असलेले हे शहर जेवढे ऐतिहासिक आहे तेवढेच येथील जिल्हा न्यायालय मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले आहे. या भूमीची मी कन्या असल्याचा अभिमान मला आहे. पूर्वीपासूनच नगर मधील वकील हे केवळ वकिली व्यवसाय न करता समाजकारणात व समाज उद्धारात योगदान देणारे आहेत. ज्येष्ठ विधीज्ञ नव्या वकिलांना प्रोत्साहन देत घडवत आहेत. येथे काम करताना अनेक वकिलांनी सहकार्य केले, प्रोत्साहन दिले. त्यातून चांगले अनुभव मिळाल्याने मी आज उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम करताना दिसत आहे. येथील कामाची शिदोरी व अनुभव अजूनही मला उपयोगी पडत आहेत. नगरच्या उत्कृष्ट कामाच्या परंपरेचे पालन पोषण करण्याची जबाबदारी आता येथील सर्व विधीज्ञांवर आहे.

न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा म्हणाले, गेल्या दोन वर्षापासून नगरमध्ये काम करत आहे. ज्या न्यायालयाने स्थापनेचे २०० वर्ष पूर्ण केले अशा न्यायालयात काम करण्याची मला संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. नगरच्या बार असोसिएशन उत्कृष्ट काम करत न्यायव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नगरमध्ये काम करताना खूप काही शिकण्यास मिळत असून चांगले अनुभव मिळत आहेत. वकील संघटनेचे अध्यक्ष नरेश गुगळे व त्यांची सर्व टीम उत्कृष्ट काम करत असल्याने त्यांचे हार्दिक अभिनंदन.

प्रास्ताविकात ॲड.नरेश गुगळे म्हणाले, नगरच्या जिल्हा न्यायालयास दोनशे वर्ष पूर्ण झाल्याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे. १८२४ मध्ये सुरू झालेल्या या न्यायालयात जुन्या काळात रूढी परंपरेने न्याय देण्याचे काम होत असे. १८२७ ला कायद्याने कामास सुरुवात झाली. त्याकाळी फार कमी नागरिक वकील असायचे पण त्यांचा स्वातंत्र्य संग्रामातही महत्त्वाचा सहभाग होता. अनेक नामवंत वकिलांनी राजकारणातही सक्रिय सहभाग घेत खासदार, आमदार व सभापतीपद भूषवले आहे. जुन्या वकिलांनी चांगले संस्कार देण्याचे काम कल्याने अनेक नामवंत वकील येथे आहेत. त्यातील ज्या वकिलांनी ४० वर्षापेक्षा अधिक जास्त वर्षे काम केले आहे अशा ज्येष्ठ वकिलांप्रति कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा सन्मान करत आहोत.

कोविड संकट काळातही वकील संघटनेने मोठे मदत कार्य उभे केले होते. आगामी काळात माझ्या वतीने एक कोटी रुपयांचा फंड उभारून त्या माध्यमातून गरजू वकिलांना मदत करणार आहे. नगरमध्ये खूप हुशार व कायदेतज्ञ वकील आहेत त्यांनी सीमा ओलांडून बाहेर जाण्याची आवश्यकता आहे.

यावेळी सरकारी वकील सतीश पाटील, सुधाकर आव्हाड, एस.बी. देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.अभय राजे, ॲड. वृषाली तांदळे व ॲड.बेबी बोर्डे यांनी केले. आभार सुनील मुंदडा यांनी मानले. यावेळी वकील संघटनेचे खजिनदार शिवाजी शिरसाठ, सहसचिव संजय सुंबे, महिला सहसचिव भक्ती शिरसाठ, कार्यकारणी सदस्य रामेश्वर कराळे, सारस क्षेत्रे, विनोद रणसिंग, देवदत्त शहाणे, अमोल अकोलकर, शिवाजी शिंदे, अस्मिता उदावंत व गौरव दांगट, विविध वकील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.


नगरमधील अमेय मुथा याने हैदराबाद येथील महिंद्रा युनिर्व्हसिटीत बी.टेक. परीक्षेत प्रथम आल्याबद्दल त्याचा सत्कार करताना आरोग्य मंत्री दामोदर राजा नरसिम्हा राव.

# हैदराबादच्या महिंद्रा युनिर्व्हसिटीत नगर येथील अमेय मुथा यास 'गोल्ड मेडल'सह बी.टेक.डिग्री



नगर – नगरमधील अमेय अमित मुथा याने हैदराबाद येथील महिंद्रा युनिर्व्हसिटीत बी.टेक.(सिव्हिल इंजिनिअरींग) डिग्री गोल्ड मेडलसह प्राप्त केली आहे. युनिर्व्हसिटीत प्रथम येण्याची कामगिरी त्याने केली. पदवीप्रदान सोहळ्यात आंध्रप्रदेशचे आरोग्य मंत्री दामोदर राजा नरसिम्हा राव यांच्या हस्ते, अपोलो हॉस्पिटल व फार्मसीच्या संस्थापिका शोभना कामिनेनी, युनिर्व्हसिटीचे कुलपती उद्योजक आनंद महिंद्रा, उप कुलपती डॉ. मेडूरी आर्दीच्या उपस्थितीत, युनिव्हर्सिटीच्या पूर्ण क्षमतेने भरलेल्या सभागृहात, भव्य दिव्य अश्या सोहळ्यात, अमेय मुथा याला गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले.

अमेय मुथा याच्या कौतुक सोहळ्यास आजोबा – आयकॉन पब्लिक स्कूलचे संस्थापक चेअरमन अशोक मुथा, आजी प्रमिला मुथा, क्रेडाई अहमदनगरचे विद्यमान अध्यक्ष, अमित मुथा, सोनाली मुथा, आयकॉन स्कूलचे ट्रस्टी निर्मल मुथा, मंजुश्री मुथा, साक्षी मुथा, सिध्दांत कटारिया उपस्थित होते. अमेय मुथा याचे इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण आयकॉन पब्लिक स्कूलमध्ये झाले आहे. बी.टेक. डिग्री गोल्ड मेडलसह मिळवणारा तो शाळेचा पहिला विद्यार्थी ठरला आहे.

अमित मुथा यांनी सांगितले की, महिंद्रा युनिर्व्हसिटी संपूर्ण देशातील एक प्रतिष्ठित युनिर्व्हसिटी असून उद्योजक आनंद महिंद्रा स्वत: अतिशय बारकाईने उच्च शैक्षणिक दर्जा राखण्यासाठी प्रयत्नरत असतात. अमेय याने या युनिर्व्हसिटीत अतिशय चांगली कामगिरी करून गोल्ड मेडल मिळवले आहे. आयकॉन पब्लिक स्कूलचे संस्थापक स्व.शरद मुथा यांनीही सन १९७२ मध्ये आयआयटी, पवई, मुंबई, येथून सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये गोल्ड मेडलसह बी.टेक पदवी मिळवली होती. आता अमेयनेही तशीच कामगिरी केल्याने आमच्या परिवारासाठी ही अभिमानास्पद बाब आहे.

# श्री साईदास परिवार ट्रस्टच्या अध्यक्षपदी अजय काळे तर विश्वस्तपदी लक्ष्मीकांत तिवारी व प्रमोद इंगळे

### १० ते १३ ऑगस्ट दरम्यान पालखी सोहळ्याचे आयोजन





नगर – नगरचा श्री साईदास परिवार ट्रस्ट मागील २० वर्षांपासून नगर ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करत आहे. या सोहळ्याचे यंदाचे हे २१ वर्ष असून ज्या वेळी पहिल्या वर्षी या पालखी सोहळा काढण्यात आला होता. त्यावेळी अवघे ६ साईभक्त होते आज त्याचे रूपांतर ५०० साईभक्तच्या रूपात झाले. यामध्ये महिलांची संख्याही लक्षणीय आहे. या वर्षी १० ते १३ ऑगस्ट दरम्यान या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष अजय काळे यांनी दिली.

यावर्षी करण्यात आलेली नूतन कार्यकारणी पुढीलप्रमाणे अध्यक्षपदी अजय सदाशिव काळे, उपाध्यक्षपदी शंकर रामभाऊ बोरुडे, खजिनदार निशिकांत किशोर शिंदे, सचिव संजय बनसोडे, विश्वस्तपदी लक्ष्मीकांत तिवारी, प्रमोद इंगळे, प्रकाश म्हस्के यांची निवड करण्यात आली तर कार्यकारणी पुढीलप्रमाणे दिलीप तावरे, शिवा श्रीमल, विजय चोधरी, कैलास नवले, विजय शिंदे, शाहीर शिंदे साईदास परिवार मागील अनेक वर्षांपासून इतर जिल्ह्यातील नगर मार्गी शिर्डीकडे जाणारे ११ पालखीचे त्यांचे निवास, भोजन आदी व्यवस्था अगदी चोखपणे पार पाडते

ज्या भाविकांना या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी पवन नागरी पतसंस्था, कॅनरा बँकेसमोर, सर्जेपुरा या ठिकाणी संपर्क साधण्याचे आवहान करण्यात आले आहे.


लालटाकी येथे लक्ष्मीआईच्या यात्रेनिमित्त पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराज शोभायात्रेत सहभागी झालेले भाविक.

# लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात

## पारंपारिक वाद्यात पोतराजसह निघालेल्या शोभायात्रेने वेधले लक्ष

नगर – महालक्ष्मी माता मित्र मंडळाच्या वतीने आषाढी अमावस्यानिमित्त लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात पार पडली. मंडळाचे अध्यक्ष साहेबराव काते यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या शोभायात्रेत पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराज व भक्तगण सहभागी झाले होते. साहेबराव काते हे महालक्ष्मीचे भक्त असून, सालाबाद प्रमाणे दरवर्षी ते यात्रा उत्सवाचे आयोजन करुन, शोभायात्रा काढत असतात.

या सोहळ्याचे हे २३ वे वर्ष असून या शोभायात्रेचे प्रारंभ लालटाकी भारस्कर कॉलनी येथून झाले. पारंपारिक वाद्यांचे गजर व लक्ष्मीमातेच्या जयघोषाने परिसर दणाणून निघाला. सर्जेपुरा, दिल्लीगेट, न्यु आर्टस महाविद्यालय मार्गे लालटाकी येथील लक्ष्मीमाता मंदिरात या शोभायात्रेचा समारोप झाला. शोभायात्रेनंतर भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. याचा भाविकांसह परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

यावेळी साहेबराव काते, सुशिलाबाई काते, आदिनाथ काते, योसेफ काते, राजू काळुंखे, मच्छिंद्र वैरागर, बहिरुनाथ वैरागर, सागर काते, संदीप त्रिभुवन, दत्तात्रय जाधव, अलंकार भोगले, यश जाधव, अनिता जाधव, आशाबाई मोहिते, सुनिल वैरागर, कार्तिका वाघमारे, भारती कुचेकर, गुनाबाई भोसले, भाग्यश्री मोहिते, संगिता कांबळे, सिताबाई वडागळे आदीसह भाविक उपस्थित होते.

# रामवाडीत लक्ष्मीआई यात्रा उत्साहात साजरी

## पोतराजांच्या नृत्याने वेधले लक्ष; भाविकांनी केला लक्ष्मीमातेचा जयघोष


रामवाडीत लक्ष्मी आई यात्रेत पोतराजांच्या नृत्याने भाविकांचे लक्ष वेधले. यात्रेत सहभागी झालेले भाविक भक्त.

नगर – शहरातील रामवाडी येथे लक्ष्मीआई यात्रा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. रामवाडी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रामवाडी परिसरातून रविवारी (दि.४ ऑगस्ट) शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराजसह भाविक सहभागी झाले होते. उंट, कलशधारी महिला, पोतराज व घोड्यांच्या बग्गीत असलेल्या लक्ष्मीमातेच्या मुर्तीने सर्वांचे लक्ष वेधले. भंडाऱ्याची उधळण करीत भाविकांनी लक्ष्मीमातेचा जयघोष केला.

या यात्रेला ५० वर्षांची परंपरा असून, दरवर्षी लक्ष्मीआई यात्रा उत्साहात साजरी केली जाते. युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीने आणलेल्या जलने रामवाडी येथील लक्ष्मी मातेच्या मुर्तीला अभिषेक घालण्यात आला. विधीवत पूजा करुन लक्ष्मी मातेची उत्सवमुर्तीची मिरवणुक शहरातून काढण्यात आली. संबळ, हलगी, ढोल व ताशांच्या निनादात पोतराजांनी स्वत:वर आसूडचे फटके ओढले. आसूड ओढताना चट्ट...चट्ट... हा एकच आवाज परिसरात घुमला.

या यात्रेनिमित्त माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे वर्षातून एकदा पोतराजचा साज चढवून देवीला अभिवादन करतात. तर यावेळी पोतराज म्हणून बबन लोखंडे, लखन लोखंडे, अशोक क्षीरसागर, इंद्रभान खुडे, ऋतिका क्षीरसागर सहभागी झाले होते. पारंपारिक वाजंत्रीत भाऊ चांदणे, महेश चांदणे, अनिल नेटके यांचा समावेश होता.

भाविकांसह युवकांनी भक्तीगीतांवर ठेका धरला होता. पारंपारिक वाद्यांनी संपूर्ण परिसर दणाणून निघाला. या शोभायात्रेत परिसरातील महिला डोक्यावर कलश, कपाळी गंध लाऊन तर भाविक सहभागी झाले होते. ही शोभायात्रा कोठला, मंगलगेट, सर्जेपूरा, रंगभवन येथून मार्गक्रमण होऊन रामवाडी येथे तिचा समारोप झाला. शनिवारी (दि.३ ऑगस्ट) रामवाडीत यात्रेनिमित्त भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

भंडाऱ्याचा परिसरातील नागरिकांनी लाभ घेतल्याची माहिती विकास उडानशिवे यांनी दिली.

# राष्ट्रसंत, शताब्दी नायक, नगरीची शान : प.पू.श्री आनंदऋषीजी म.सा.



आपला नगर जिल्हा संत परंपरेने नटलेला, सहकारासह अध्यात्म आसक्तीने बहरलेला आहे. श्रावणाच्या आगमनाने सर्वदूर हिरवाई व आनंददायी वातावरण बनलय. याच श्रावणाच्या प्रथम दिनी (ज्या प्रमाणे कालिदास हे आषाढस्य प्रथमदिने) राष्ट्रसंत आचार्यसम्राट पू.श्री.आनंदऋषीजी म.सा.यांचा जन्म उत्सव दिन. यंदा श्रावणाच्या पहिल्या सोमवारी ५ ऑगस्ट रोजी गुरुदेवांचा १२५ वा महत्वपूर्ण जयंती उत्सव आहे. पूज्य आनंदऋषीजी म.सा. हे केवळ जैनांचेच नव्हे तर सर्व जातीधर्माच्या भक्तांचे श्रध्दास्थान आहेत.

पूज्य गुरुदेवांचे संपूर्ण आयुष्य धर्म, ज्ञान साधना, माणुसकीला वाहून घेतलेले होते. ते सदीचे महानायक होते. आदर्श अशा जीवनात त्यांनी सर्वोत्तम धर्मप्रभावना करून विलक्षण ठसा पुढील अनेक शतकांसाठी उमटवून ठेवला आहे. उत्कट मोठेपणातही जीवनात साधी, सहजता व नम्रता होती.

***किसी को नही था उनके कद का अंदाज ।***
***वो आसमान था लेकीन झुककर चलता था।।***

पूज्य गुरुदेवांना प्रत्यक्ष पाहण्याचा, त्यांची दैनंदिन धार्मिक व अध्यात्मिक जीवनचर्या पाहण्याचा, अनुभवण्याचा प्रत्यय लाखो नगरकरांना व श्रध्दाळूंना आला आहे. संयमित स्थिरता हे त्यांचे खास गुणवैशिष्ट्ये होते. ते खरोखर स्थिर, स्थितप्रज्ञ होते. केवळ शरीरानेच नव्हे तर मनाने व आत्म्याने सुध्दा. त्यांनी श्रावकांमध्ये, सर्वधर्मीय भक्तांमध्ये श्रध्देचे अंकुर लावले व परोपकार शिकवला. सर्वांना एकत्र ठेवून सामाजिक एकता, संघटनेला प्राधान्य दिले. त्यांच्यामुळेच जैनीयांचा श्रमण संघ, सशक्त व देशभर कार्यान्वित झाला. या अर्थाने ते खरेखुरे राष्ट्रसंत होते. सात्विकता, साधेपणा, शालिनता ही त्यांची जीवनसाधना आजच्या अवडंबर व भपकेपणाच्या काळात अधिकच महत्वाची ठरते.



पूज्य गुरुदेवांचे गुरु प.पू.रत्नऋषीजी म.सा.हे स्वत:च एक रत्नपारखी होते. त्यांनी आनंदऋषीजींना अनेक पैलू पाडून कोहिनूर हिरा बनवले. आई वडिलांकडून संस्कार घेतलेल्या गुरुदेवांनी आपल्या रत्नमयी गुरुदेवांकडून शिस्त शिकून घेतली. आपल्या सहजसुंदर व्यक्तीत्वाने धार्मिक, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रात कर्तृत्व गाजवून त्यांनी भारतीय ऋषी परंपरेचे दमदार नेतृत्व केले. पूज्य गुरूदेवांच्या ज्ञानसाधना उपक्रमाचे तर मानावे तेवढे उपकार कमीच आहेत. सामान्यत: शतकापूर्वी भारत पारतंत्र्यात होता, शैक्षणिक व एकूणच मागासलेला होता. पूज्य दादा गुरु व त्यांच्या गुरुंचे मार्गदर्शन, प्रेरणेने आचार्यश्रींनी संस्कृत, मोडी लिपी, यासह जैन दर्शनासह विविध धर्मांच्या तत्वज्ञानादिचा गहन अभ्यास केला. ज्ञान साधना ही सर्वकालिन व सर्वात कठिण तपस्या आहे. गुरुदेवांचे अवलोकन व अभ्यासाने जैन धर्माच्या शैक्षणिक प्रचार प्रसाराची कमतरता त्यांना भासली. अगोदरच अल्पसंख्याक समाजातील मंडळी आपल्या पारंपरिक छोट्या उद्योगांत कसेतरी जगत होते. ही गोष्ट शंभर वर्षापूर्वीची. त्यासाठी निरंतर चिंतन, मनन करून दि.२५ डिसेंबर १९३६ रोजी गुरुदेवांनी आपल्या साधूसाध्वींसह श्रावकांसाठी 'श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड'ची स्थापना केली. आपल्या साधूंसह समाजही ज्ञानवंत व्हावा ही संकल्पनाच महान आहे. शिक्षण हे सहजसाध्य सोपे नाही व कधीच नसते. खेड्यापाड्यातील जैन स्थानकांत साधूसंत नसताना विशेषत: पर्युषण पर्वात धर्म आराधना करण्यासाठी त्यांनी १९८१ मध्ये राहाता येथे 'अ.भा.वर्धमान स्थानकवासी जैन स्वाध्याय संघ' स्थापन केला. यातून हजारो स्वाध्यायी घडवले. स्वाध्यायी फंड साक्षम झाल्यास भविष्यातही ही ज्ञान गंगा वाहत राहिल. लहान मुलांकरिता त्यांनी 'पूज्यपाद तिलोक पाठशाला' निर्माण केली. याव्दारे येणाऱ्या पिढीला चांगले संस्कार मिळावे, सक्षम नवी पिढी तयार व्हावी ही भावना आहे. सन १९३६ मध्ये पाथर्डीत प्रारंभ केलेला ज्ञानयज्ञ सन १९८६ मध्ये नगरच्या आजच्या आनंदधाम परिसरात प्रभावीपणे प्रज्वलित झाला असून पूर्ण भारतवर्ष तसेच अवघ्या नगरकरांचे हे श्रध्दास्थान आहे. पूज्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा., चिचोंडीचे आनंदबाबा यांचे साक्षात दर्शन, मार्गदर्शन लाभले हे तुम्हाआम्हा सर्वांचे भाग्यच आहे.

ज्याप्रमाणे विश्वसंत ज्ञानोबांनी ज्ञानेश्वरी लिहिली (नेवासा), श्रध्दासबुरीचा मंत्र देणाऱ्या शिर्डीच्या साईबाबांनी सर्वधर्मसमभावाची प्रेरणा दिली. त्याचप्रमाणे आचार्यश्री आनंदऋषीजींनी भक्तीभाव व ज्ञानसाधना वृध्दींगत केली. आज त्यांच्या महानिर्वाण पश्चात त्यांच्या आदर्श शिष्यांनी हे कार्य अधिक समृध्द केले आहे व करीत आहेत. लाखो रूग्णांना दवा व दुवा देणारे व मोफत उपचार व किमान दरात महागड्या शस्त्रक्रिया करणारे 'श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल', ब्लड बँक, नर्सिंग कॉलेज, नेत्रालय, केवळ ३५ रुपयांत रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांना सात्विक भोजन देणारे महावीर सॅनेटोरियम, मनाला आत्मिक शांती व समाधान देणारा 'आनंदधाम' परिसर ही गुरुदेवांना खरी श्रध्दांजली ठरत आहे. यामुळे जैन समाजाचेही शहराच्या प्रगतीत मोठे योगदान झालेले आहे. लवकरच कार्यान्वीत होणारे 'वर्धमान महावीर युनिर्व्हसिटी' शहराच्या शिरपेचात मानाचे पान ठरेल याचा विश्वास वाटतो.

गुरुदेवांच्या जन्म उत्सव दिनी त्यांच्या स्मृतीस वंदन करताना म्हणावेसे वाटते की

***जीवन जीना बहुत आसान नही होता, संघर्ष के बीना, कोई महान नही होता।***
***जब तक न पडे हथौडे की कोई चोट, तब तक पत्थर भी भगवान नही होता।***

**– किशोर गांधी, मो.९८२२०२०६९१, सदस्य– जैन सोशल फेडरेशन, नगर**

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिरांची मालिका रुग्णांसाठी वरदान ठरत आहे

### विजय संकलेचा यांचे प्रतिपादन; पोटाचे विकार तपासणी शिबिरात १०८ रुग्णांची तपासणी

नगर - आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या आशीर्वादामुळे अनेक रुग्ण बरे होत आहेत. आरोग्य सेवेपासून कोणीही वंचित राहू नये. यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये वर्षातून दोनदा मार्च व ऑगस्ट म हिन्यामध्ये मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे भरविली जात आहेत. या शिबिरातून अत्यल्प दरात शस्त्रक्रिया करून रुग्णांची सेवा केली जात आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलची आरोग्य शिबिरांची मालिका रुग्णांसाठी वरदानच ठरत आहे.असे प्रतिपादन उद्योजक विजय संकलेचा यांनी केले आहे.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित पोटाचे विकार तपासणी शिबिराचे दिपप्रज्वलनाने उद्घाटन करताना उद्योजक विजय संकलेचा व संकलेचा परिवारातील सदस्य.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२४ व्या जन्मजयंतीनिमित्त जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ट सर्जरी सेंटर येथे पोटाचे विकार तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन विजय संकलेचा यांच्या हस्ते झाले. यावेळी सौ.साधना संकलेचा, राजेंद्र संकलेचा, सिद्धांत संकलेचा, सौ.संगीता संकलेचा, संजय संकलेचा सौ.नीता संकलेचा, अमित संकलेचा, इंजिनीअर राजेंद्र पोतदार, भास्कर पोतदार, जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, सतीश लोढा, माणक कटारिया, डॉ.आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ज्ञ डॉक्टर डॉ.राजेंद्र गुंजाळ आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, स्व.माणकचंद संकलेचा हे निष्णात विधीज्ञ होते. त्यांनी प्रामाणिकपणे विधी क्षेत्रात योग्य सल्ला देण्याचे उत्कृष्ट कार्य केले आहे. पूर्वीपासूनच संकलेचा परिवार सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. संकलेचा परिवार त्यांच्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिर घेत आहेत. रुग्णांची मनोभावे सेवा करण्याच्या उद्देशाने संकलेचा परिवार आरोग्य शिबिरात योगदान देत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये वर्षातून दोन वेळा मार्च व ऑगस्ट महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणात शिबिरे घेण्यात येतात. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजनेमार्फत अनेक रुग्णांची शस्त्रक्रिया मोफत करण्यात येते.

डॉ.राजेंद्र गुंजाळ म्हणाले, या शिबिरात पोटाचे विकार, लिव्हर, स्वादुपिंड, कॅन्सर यासारख्या आजारांचे निदान व उपचार केले जाणार आहे.तसेच शिबिरात आवश्यक तपासणी अत्यल्प खर्चात केली जाणार आहे.या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.

सिद्धांत संकलेचा म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सर्व विश्वस्त, डॉक्टर्स व कर्मचारी सेवाभावी वृत्तीने व तळमळीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत.या आरोग्य शिबिरात संकलेचा परिवाराला सहभागी होण्याची संधी दिली त्या बद्दल मनस्वी आभार.

राजेंद्र पोतदार म्हणाले, शिबिराचे माध्यमातून गरजु रुग्णांना मिळणारी सेवा ही कौतुकास्पद बाब आहे. पुर्वी उपचारासाठी रूग्णांना मुंबई, पुणे येथे जावे लागत होते. परंतु आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक पद्धतीने उपचार मिळत असल्याने रुग्णांना दिलासा मिळत आहे.

या शिबिरास प्रतिसाद मिळाला १०८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. तर आभार सतिश लोढा यांनी मानले.



आषाढ आमवस्या निमित्त जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या महिला आघाडीच्या वतीने कोर्ट गल्ली येथील सुयोग मंगल कार्यालयात रविवारी सायंकाळी दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

# आषाढ अमावस्या निमित्त दीपोत्सव

### अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचा उपक्रम

नगर - आषाढ अमावस्या निमित्त अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाच्या महिला आघाडीच्यावतीने कोर्टगल्ली येथील सुयोग मंगल कार्यालयात रविवारी सायंकाळी दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. जिल्हा ब्राह्मण सेवा सघाचे संस्थापक किशोर जोशी यांच्या संकल्पनेतून राबविलेल्या गेलेल्या उपक्रमास पुरोहित व महिला उपस्थित होत्या.

यावेळी विठ्ठल रुख्मिणीची महाआरती करण्यात आली. यानिमित्त उपस्थित महिलांमध्ये खेळ पैठणीचा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सुजाता रामदासी यांनी पैठणी जिंकली.

यावेळी बोलतांना किशोर जोशी म्हणाले, आषाढ आमवस्येला दीपपुजन अत्यंत पवित्र मानले जाते. लाखो वर्षांपासून आपली ही परंपरा चालू आहे. परंतु अलीकच्या काळात या पवित्र दिवसाला गटारी आमवस्या म्हणून बदनाम केले जाते. म्हणूनच दिप पुजनाचे महत्व असलेल्या दिवसाबद्दल जागृती व्हावी या उद्देशाने आपली पारंपारिक संस्कृती जपत ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने दरवर्षी हा दीपोत्सव साजरा केला जातो. यासाठी महिला आघाडीच्या सदस्या, ब्राह्मण संघाचे पदाधिकारी व नागरिक उत्स्फुर्त प्रतिसाद देतात.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे निलेश धर्माधिकारी, चकोर मुळे, प्रसाद धर्माधिकारी, सुमित कुलकर्णी, प्रसाद कुलकर्णी, सुनिता देव, स्वाती नगरकर, रोहिणी पुंडलिक, राजेंद्र देव, पंकज धर्माधिकारी व दिनेश जोशी आदींसह महिला व नागरिक उपस्थित होते.

# हसतखेळत जुळले मैत्रीचे अतूट बंध.. बालघर संस्थेत साजरा झाला अनोखा मैत्री दिन

### भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व अपराईज ट्युटोरियल्सचा उपक्रम

नगर - विविध गाणी, नृत्याविष्कार, हास्यविनोद, केक कटिंग, फ्रेंडशिप बेल्वाट, स्टेशनरी बॉक्स मेकींग, गप्पा गोष्टी, दिलखुलास संवाद अशा मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पात मुलांनी फ्रेंडशिप डे साजरा केला. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व अपराईज ट्युटोरियल्सच्या इयत्ता ११ वी १२ वी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी 'बालघर' येथील मुलांना फ्रेंडशिप डेची अनोखी भेट देत त्यांना आपली मैत्री कायम घट्ट राहिल असा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी संस्थेसाठी किराणा, कपडे तसेच जीवनावश्यक गरजेच्या वस्तूही भेट म्हणून दिल्या. आपल्यालाही नवीन मित्र मिळाले व त्यांनी आपल्यासोबत मैत्री दिन साजरा केल्याने बालघर येथील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



बालघर येथील मुलांसमवेत मैत्री दिन साजरा करताना भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूमधील ११ वी, १२ वी चे विद्यार्थी.

रविवारी सर्वत्र मैत्री दिवस साजरा झाला. बालघर संस्थेत असलेल्या वंचित मुलांसाठीही हा दिवस खास ठरला. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सकाळीच संस्थेत हजेरी लावून आनंदोत्सवास सुरुवात केली. विविध खेळ खेळण्यात सर्व मुले रममाण झाली होती. अनेकांनी गाणे गाण्याचा आनंद लुटला तसेच नृत्याविष्कारही सादर केला. फिरोदिया शाळेच्या मुलांनी स्वत: केक तयार करून आणला होता. तसेच मुलांना फ्रेंडशिप बॅण्ड तयार करणे, स्टेशनरी बॉक्स तयार करण्यास शिकवले. यावेळी बालघर येथील मुलांनी सुंदर लेझीम नृत्य सादर केले. फिरोदिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या अंगठ्यांचे ठसे कागदावर उमटवून एक संस्मरणीय भेट बालघर प्रकल्पातील मुलांना दिली. मैत्री दिनाचा केक कापून सर्व मुलांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

यावेळी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, प्रकाश गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमास संस्थेच्या सुनिता मुथा, अपराईज ट्युटोरियल्सचे सी.ए. उमेश दोडेजा, सी.ए. चिराग कासवा, प्रज्ञा मुनोत, अॅड. निकिता मुथा, बालघरचे योगेश गुंड उपस्थित होते.

सुनिता मुथा म्हणाल्या की, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये मुलांना नेहमीच सामाजिक बांधिलकीची शिकवण दिली जाते. बालघर प्रकल्पात अतिशय समर्पित भावनेने वंचित गरीब मुलांचा सांभाळ केला जात आहे. या मुलांप्रती आस्था प्रकट करण्यासाठी मैत्री दिन साजरा करण्यात आला. यात दोन्ही कडच्या मुलांना अनोखा आनंद नक्कीच मिळाला आहे. मुलांनीही आपले वाढदिवस अशा संस्थेत येऊन येथील मित्रांसमवेत साजरे करावेत.

योगेश गुंड म्हणाले की, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल परिवार, छायाताई फिरोदिया यांचे संस्थेस नेहमीच सहकार्य लाभले आहे. आज याठिकाणी विद्यार्थ्यांनी एकत्र येत बालघर प्रकल्पातील मुलांशी मैत्री केली आहे. हे मैत्रीचे धागे भविष्यातही कायम राहतील असा विश्वास आहे.

सी.ए.उमेश दोडेजा म्हणाले, कौटुंबिक परिस्थिती चांगली असलेली मुले मोठ्या शाळांमध्ये शिक्षण घेतात. अशावेळी त्यांना समाजातील वंचित घटकाचीही जाण असणे आवश्यक आहे. मैत्री ही निखळ असते. त्यात कोणताही भेदभाव नसतो. हीच शिकवण देण्यासाठी बालघर संस्थेत मैत्री दिन साजरा करण्याचा उपक्रम राबविला.

# एक माणूस एक झाड हा उपक्रम प्रत्येकाने राबवावा : विष्णु महाराज शर्मा

### राजस्थानी परिवाराच्यावतीने बेलेश्वर मंदिर परिसरात ५१ झाडांचे वृक्षारोपण

नगर - प्रत्येकाने एक तरी झाड लावावे.कोरोना काळात ऑक्सिजनचे महत्त्व मानवाला समजले आहे. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज आहे.सध्या वृक्षांची तोड मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे पाऊस वेळेवर होत नाही. समाजातील सर्व नागरिकांनी 'एक माणूस एक झाड'हा उपक्रम हाती घेऊन वृक्षारोपण करावे.त्याचा फायदा मानवाला भविष्यात नक्कीच होणार आहे, असे प्रतिपादन राजस्थानी परिवाराचे विष्णू महाराज शर्मा यांनी सांगितले आहे.



बेलेश्वर मंदिर परिसरात राजस्थानी परिवाराच्या वतीने ५१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

हरताली अमावस्या व श्रावण महीन्याच्या सुरुवातीलाच राजस्थानी परिवाराच्या वतीने भिंगार येथील बेलेश्वर मंदिर परिसरात ५१ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी राजस्थान परिवाराचे विष्णु महाराज शर्मा, ब्रम्हानन्द पारिक, बाली जोशी, हिमता रामजी देवाशी, दलाराम देवाशी, जेरूपा रामजी देवाशी, पराग देवाशी, जगदीश देवाशी, दुर्गेश चौधरी, गणेशा राम चौधरी, राजू भाई चौधरी, रमेश चौधरी, चम्पालाल चौधरी, बस्तीराम चौधरी, सवाई सिंह राज पुरोहित, रेवत सिंह, भवानी सिंह बन्ना, प्रताप सिंह बन्ना, ललित रावल, लालचंद कुमावत, विक्रमसिंह शिवसागर, रामवतार गुजर, नेमीचन्द जागीड, विनोद तिवारी, श्रीगोपाल जोशी, मुकेश खजवाणीया, श्रीनिवास खंडेलवाल, जितेन्द्र खंडेलवाल आदींसह समस्त राजस्थानी परिवार उपस्थित होते.

# जॉईज आयोजित स्नेहउत्सवमधील बुध्दीबळ स्पर्धेला प्रतिसाद

नगर - जैन ओसवाल पंचायत सभेच्या जैन ओसवाल युवक संघाच्यावतीने जुडेंगे तो बढेंगे या मंत्रावर आधारित स्नेह उत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. यात रविवारी सिताबन लॉन्स येथे बुध्दीबळ स्पर्धा पार पडली. लहानांपासून मोठ्यापर्यंत १५० हून अधिक स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला. जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेह उत्सव पार पडत आहे.



जॉईज आयोजित स्नेहउत्सवमधील बुध्दीबळ स्पर्धेत सहभागी खेळाडू.

अहमदनगर जिल्हा चेस सर्कलचे अध्यक्ष यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, संजय खडके, रोहित आडकर, देवेंद्र ढोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा झाली. लहान मुलांबरोबरच मोठ्यांनीही स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांशी बुध्दीबळाच्या पटावर दोन हात केले. चाली प्रतिचाली रचत विजय मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्पर्धा लक्षवेधी ठरली.

विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण १५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे, अशी माहिती जॉईजचे अध्यक्ष प्रतिक बाबेल व सेक्रेटरी सचिन मुनोत यांनी दिली. विविध स्पर्धा यशस्वीतेसाठी जैन ओसवाल पंचायत सभा तसेच जॉईजचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

# वंजारी समाजाचे नगरमध्ये २५ ऑगस्टला राज्यस्तरीय साहित्य संमेलन



गणेश खाडे राजकुमार आघाव रेणुका वराडे घनश्याम बोडके

नगर - वंजारी समाज महासंघ आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलन २५ ऑगस्ट रोजी आहिल्यानगर शहरात गंगा लॉन्स, निर्मलनगर, येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. राज्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महासंघाने केले आहे.

समाजाचे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन ऐतिहासिक होईल असा विश्वास संमेलन स्वागताध्यक्ष विश्वविजेते कुस्ती खेळाडू राजकुमार आघाव पाटील, स्वागत अध्यक्षा रेणुका वराडे, सहस्वागत अध्यक्ष घनश्याम बोडखे, निमंत्रक जिल्हा अध्यक्ष मल्हारी खेडकर यांनी व्यक्त केला.

सन डिसेंबर २०२२ मध्ये नाशिक येथे वंजारी समाजाचे पाहिले राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. याच वेळी सामाजिक संस्कृतीला बळकटी मिळाली पाहिजे म्हणून वेगवेगळ्या जिल्ह्यात संमेलन झाली पाहिजेत आणि यासाठी द्विवार्षिक संमेलन हि परंपरा निर्माण करण्याचा निर्णय झाला आणि याच निर्णयांच्या अनुषंगाने २५ ऑगस्टला नगरमधील गंगा लॉन्स संत भगवानबाबा चौक निर्मलनगर येथे हे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलेल आहे. या संमेलनासाठी मावळते संमेलनाध्यक्ष प्रा. वा. ना. आंधळे सर यांनी नांदेड येथील साहित्यिक प्रा. डॉ. सांगिता घुगे यांची संमेलन अध्यक्षपदी निवड घोषित केली असून उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य डॉ. गजानन सानप हे असून या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार निलेश लंके, माजी खासदार सुजय विखे, आ. संग्राम जगताप, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, आ. बाळासाहेब थोरात, आ. प्राजक्त तनपुरे, आ. मोनिकाताई राजळे, आ. रोहित पवार, वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक गणेश खाडे, उद्योगपती बुधाजीराव पानसरे तसेच राज्याच्या वेगवेगळ्या भागातील साहित्यिक यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहे

या संमेलन आयोजित करून सामाजिक समता निर्माण व्हावी यासाठी ऐतिहासिक पाऊल म्हणून याच संमेलनात सामाजिक समतेचे बीजारोपण करण्यात येईल त्यासाठी वेगवेगळ्या जाती धर्मातील साहित्यिक यांना देखील गौरविण्यात येणार आहे. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी नगर जिल्ह्यातील गावागावांतील समाज बांधवांपर्यंत संमेलनाचे निमंत्रण दिले जाईल. त्या सोबत जिल्ह्यातील इतिहासात नोंद होईल असे संमेलन आयोजित करून यशस्वी करू, अस मत वंजारी समाजाच्या दुसऱ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष राजकुमार आघाव आणी महासंघाचे उपजिल्हाप्रमुख घनश्याम बोडखे यांनी व्यक्त केले.



गायक स्व.किशोरकुमार यांच्या जयंतीनिमित्त नगरच्या किशोरकुमार फॅन्स क्लबच्या वतीने देण्यात येणारा किशोरकुमार सन्मित्र पुरस्कार जेष्ठ संगीतप्रेमी व उद्योजक धनेश बोगावत यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

# धनेश बोगावत यांना किशोरकुमार सन्मित्र पुरस्कार प्रदान

नगर - गायक स्व.किशोरकुमार यांच्या जयंतीनिमित्त नगरच्या किशोरकुमार फॅन्स क्लबच्या वतीने देण्यात येणारा किशोरकुमार सन्मित्र पुरस्कार ज्येष्ठ संगीतप्रेमी व उद्योजक धनेश बोगावत यांना नुकताच प्रदान करण्यात आला. माउली सभागृह येथे किशोरकुमार फॅन्स क्लबच्या वतीने आयोजित संगीत महोत्सवात श्री.बोगावत यांना संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास उद्योजक जयेश मेहता, चित्रकार प्रमोद कांबळे, माजी नगरसेवक अविनाश घुले, रोटरी मिडटाऊन क्लबचे अध्यक्ष अजय पिसूटे, कार्यक्रमाचे संयोजक गायक अजय दगडे, किरण गवते, प्रल्हाद जोशी, अमोल खोले, प्रा.प्रसाद बेडेकर व सौ.बोगावत आदींसह रसिक उपस्थित होते.

यावेळी धनेश बोगावत म्हणाले, नगरला खूप मोठी वैभवशाली संगीत परंपरा लाभली आहे. हे आपले भाग्य आहे. अनेक दिग्गजांनी हे संगीत जपले व पुढे नेले आहे. माझे वडील स्व.छगन बोगावत हे मोठे संगीत प्रेमी होते. त्याकाळी त्यांनी स्वरसाद नावाचा ऑर्केस्ट्रा नगरमध्ये चालू केला होता. पूर्वीपासूनच आमच्या घरात अनेक संगीत मैफली रंगत असत. माझ्या वडिलांकडूनच मला संगीत विरासतमध्ये मिळाले आहे. नगरमध्ये संगीत वाढावे यासाठी माझेही प्रयत्न चालू आहेत. किशोरकुमार यांच्या नावाने मला आज मला मिळालेला पुरस्कार मी वडील स्व.छगन बोगावत यांना समर्पित करीत आहे. हा पुरस्कार माझी जबाबदारी वाढवणारा आहे. त्यामुळे नगरच्या हौशी गायकांना मोठे व्यासपीठ मिळावे यासाठी नगरमध्ये लवकरच एका भव्यदिव्य संगीत मैफलीचे आयोजन मी करीत आहे, असे सांगून क्लबचे आभार मानले.

# एक लाख दिव्यांगांचे वादळ ९ ऑगस्टच्या क्रांती दिनी संभाजीनगरला धडकणार

### मोर्चात जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन

नगर - दिव्यांगांच्या विविध मागण्या मंजूर करून घेण्यासाठी महाराष्ट्रातील दिव्यांग बांधव संभाजीनगर (औरंगाबाद) येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चाने धडकणार आहे. आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (दि.९ ऑगस्ट) वीराट आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती प्रहार दिव्यांग क्रांतीचे प्रसिद्ध प्रमुख पोपटराव शेळके यांनी दिली. या मोर्चात जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष अॅड. लक्ष्मण पोकळे यांनी केले आहे.

दिव्यांगांना दरमहा ६ हजार रुपये मानधन मिळावे, सरसकट दिव्यांगाना घरकुल, दिव्यांगांचे नोकर भरती, राजकीय आरक्षण, व्यवसायासाठी जागा, अपंग वित्त महामंडळ व बीज भांडवल आणि कर्जमाफी मिळावी आदी मागण्यांसाठी हा आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. अहमदनगर जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने दिव्यांग बांधव या मोर्चात सहभागी होण्यासाठी संघटनेच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे.

हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील पदाधिकारी पांडुरंग कासार, हमीद शेख, किशोर सूर्यवंशी, संदेश रपारिया, राजेंद्र पोकळे, मधुकर घाडगे, सलीम शेख, लक्ष्मीबाई देशमुख, लक्ष्मण अभंग आदी प्रयत्नशील आहेत.

# अर्थजगत

प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याच्या ३१ जुलै या अंतिम मुदतीपर्यंत एकूण ७.२८ कोटी प्राप्तिकर विवरणपत्रे दाखल करण्यात आली, ही संख्या मागील कर-निर्धारण वर्षाच्या तुलनेत ५१ लाखांनी अर्थात ७.५ टक्क्यांनी अधिक आहे, असे प्राप्तिकर विभागाकडून शुक्रवारी स्पष्ट करण्यात आले. गेल्या वर्षी एकूण ६.७७ कोटी करदात्यांनी प्राप्तिकर विवरणपत्रे दाखल केली होती. प्राप्तिकर विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा बहुतांश म्हणजेच ७२ टक्के करदात्यांनी नवीन कर प्रणालीचा स्वीकार केला आहे. या प्रणालीनुसार ५.२७ कोटी करदात्यांसाठी विवरणपत्र भरले आहे. तर २.०१ कोटी करदात्यांनी जुनी कर प्रणालीनुसार विवरणपत्र दाखल केले आहे. उल्लेखनीय म्हणजे जुन्या कर प्रणालीला पसंती देणाऱ्या करदात्यांचे प्रमाण २८ टक्क्यांवर कायम आहे.




## घसरणीच्या सरी...?

भारतीय शेअर बाजारात सलग काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या तेजीच्या प्रवासाला गतसप्ताहामध्ये ब्रेक लागल्याचे दिसून आले. खरे पाहता मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांनी सेन्सेक्स आणि निफ्टीच्या तुलनेत चांगली कामगिरी केली होती. विविध कंपन्यांचे तिमाही निकाल, मान्सूनचा दिलासा आणि सप्टेंबर महिन्यामध्ये होणाऱ्या बैठकीमध्ये अमेरिकन फेड रिझर्व्हकडून व्याजदर कपातीचे संकेत यामुळे सप्ताहादरम्यान या निर्देशांकांनी नवीन उच्चांक गाठला. तथापि, अमेरिकेतील संभाव्य मंदीचे संकेत आणि भूराजकीय तणावाच्या भीतीमुळे बाजारात विक्रीचा आणि नफावसुलीचा मारा सुरू झाला आणि निर्देशांकांना मागे ढकलण्यात आले. २ ऑगस्ट रोजी संपलेल्या सप्ताहामध्ये सेन्सेक्समध्ये ३५०.७७ अंकांची घसरण ऑनलाईन विक्रीतही घट झाली आहे. अमेरिकेतील बेरोजगारीचा दर ४.३ टक्क्यांवर पोहोचला असून ऑक्टोबर २०२१ नंतरचा हा उच्चांक आहे. साहजिकच या सर्व घडामोडींचे परिणाम भारतासह जगभरातील बाजारांवर सोमवारी दिसून येणार आहेत.

चालू आठवड्यात ८ ऑगस्ट रोजी केंद्रीय रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरणाची घोषणा होईल. या पतधोरणात व्याजदर कपातीची शक्यता कमी आहे; परंतु महागाईसंदर्भात गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे विवेचन बाजारासाठी महत्त्वाचे असेल.

याखेरीज या आठवड्यामध्ये भारती एअरटेल, बीईएमएल, ओएनजीसी, एनएचपीसी, एलआयसी आणि एमआरएफ यांसारख्या दिग्गज कंपन्यांच्या तिमाही निकालांची घोषणा करण्यात येणार आहे.





होऊन ८०,९८१.९५ अंकांवर हा निर्देशांक बंद झाला; तर निफ्टी-५० मध्ये ११७.१५ अंकांची घसरण होत हा निर्देशांक २४,७१७.७० अंकांवर बंद झाला. याउलट स्मालकॅप निर्देशांकामध्ये ०.६ टक्क्यांची वृद्धी दिसून आली. सप्ताहादरम्यान निफ्टी५० निर्देशांकाने २५,०७८.३० हा नवा उच्चांक प्रस्थापित केला; तर सेन्सेक्सने १ ऑगस्ट रोजी ८२,१२९.४९ हे नवे शिखर गाठले.

- सेन्सेक्स : ८०,९८१.९५ (-८८५.५९)
- निफ्टी : २४,७१७.७० (-२९३.२०)
- बँक निफ्टी : ५१,३५०.१५ (-२१३.८५)
- फिन निफ्टी : २३,३६५.९० (-६९.९५)

गतसप्ताहातील शेवटच्या सत्राचे बंदपातळी भाव

अन्य क्षेत्रांवर नजर टाकल्यास निफ्टी आयटी आणि रियल्टी क्षेत्राच्या निर्देशांकांमध्ये गतसप्ताहात ३-३ टक्क्यांची घसरण झाली; तर निफ्टी ऑटो इंडेक्समध्ये २ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी गेल्या आठवड्यातही विक्रीचा मारा कायम ठेवल्याचे दिसले. एफआयआयकडून गतसप्ताहात १२,७५६.२६ कोटींच्या समभागांची विक्री करण्यात आली; तर डीआयआयकडून १७,२२६.०६ कोटींच्या समभागांची खरेदी करण्यात आली. गतसप्ताहात सेन्सेक्समधील आघाडीच्या १० कंपन्यांपैकी ८ कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे १.२८ लाख कोटींनी घसरल्याचे दिसून आले. यामध्ये प्रामुख्याने आयटी क्षेत्रातील टीसीसएस आणि इन्फोसिसचा वाटा मोठा राहिला.

चालू आठवड्यातील बाजाराची स्थिती कशी राहील याचा विचार करता शुक्रवारी अमेरिकन बाजारात झालेल्या घसरणीचे पडसाद भारतासह जगभरातील शेअर बाजारामध्ये पडण्याची शक्यता आहे. अमेरिकेमध्ये मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा पीएमआय डेटा आणि बेरोजगारीचे आकडे अपेक्षेपेक्षा अधिक असल्याचे दिसून आल्यामुळे आर्थिक मंदीची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः आयटी कंपन्यांच्या समभागामध्ये जोरदार विक्री पाहायला मिळाली. विशेषतः इंटेल या संगणक चिपनिर्मितीच्या क्षेत्रातील दिग्गज कंपनीचे तिमाही निकाल खराब आल्यामुळे या कंपनीच्या समभागामध्ये विक्रीचा मारा इतका तुफानी झाला की गेल्या ५० वर्षातील विक्रम मोडीत निघाले. एकाच दिवसांत हा समभाग २६ टक्क्यांनी घसरले. परिणामी, आयटी कंपन्यांचे प्रतिनिधीत्व करणारा नॅसडॅक निर्देशांक ४५० अंकांनी घसरला. जपानचा निक्केईही ५ टक्क्यांनी घसरला. इंटेलकडून १५ टक्के कामगारांची कपात करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. दुसरीकडे ॲमेझॉनच्या त्यांचाही परिणाम बाजारावर होताना दिसेल. भारतीय बाजारासाठी सकारात्मक बाब म्हणजे कच्च्या तेलाच्या दरात झालेली जोरदार घसरण. तथापि, ती मंदीच्या शक्यतांमुळे झालेली असल्याने त्याबाबत चिंता अधिक आहे.

टेक्निकल चार्ट पाहिल्यास २४,६०० आणि २४५०० च्या पातळीवर निफ्टी-५० साठी भक्कम आधार दिसत आहे. २४,५४० ही पातळी त्यादृष्टीने महत्त्वाची आहे. त्याखाली घसरण झाल्यास निफ्टी २४३०० पर्यंत येऊ शकतो. याउलट ही आधार पातळी कायम राहिल्यास २४८६० पर्यंत पुन्हा वरच्या बाजूला जाण्याचा प्रयत्न करु शकतो. जागतिक बाजारातील स्थिती पाहता पुढील काही दिवस एका ठरावीक रेंजमध्येच बाजार फिरत राहताना दिसू शकतो. भारतीय अर्थव्यवस्थेसाठीचे सर्व घटक सकारात्मक असल्यामुळे आणि आपल्याकडील एसआयपीद्वारे होणारा इनफ्लो भक्कम असल्याने घसरणीच्या स्थितीत बाजाराला आधार मिळू शकतो.

**शेअर बाजार**

समभागांच्या पातळीवर विचार करता उच्च मूल्यांकन असणाऱ्या समभागांमध्ये चालू आठवड्यात काही अंशी घसरण दिसू शकते. घसरणीच्या काळात काही चांगल्या समभागांवर लक्ष ठेवून खरेदीची संधी साधता येईल. यामध्ये आयटीसीचा समभाग ५७५ रुपयांचे लक्ष्य ठेवून दीर्घकालीन मुदतीसाठी खरेदी करता येईल. मारुती सुझुकीच्या समभागात शुक्रवारी ४.७ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली; तथापि मध्यमकालीन दृष्टिकोन ठेवून हा समभाग १४००० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. एमॲंडएमच्या समभागात २.७९ टक्क्यांची घसरण होऊन हा समभाग २७४९ रुपयांवर आला आहे. यामध्ये आणखी घसरण झाल्यास ३२०० रुपयांचे लक्ष्य ठेवून मध्यमकाळासाठी त्याची खरेदी करता येईल. एबीसी कॅपिटलचा समभाग २२२ रुपयांदरम्यान खरेदी करुन २४५ रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल. याखेरीज आगामी सणासुदीचा काळ लक्षात घेता एफएमसीजी कंपन्यांच्या समभागांमध्ये खरेदी केल्यास पुढील तीन-चार महिन्यांमध्ये चांगला परतावा मिळू शकतो.

जागतिक बाजारातील स्थितीचा प्रभाव किती तीव्रतेने होतो यावर चालू आठवड्यातील रणनीती आखावी लागेल. सद्यस्थितीतील एकंदर परिस्थिती सेल ऑन राईज धोरण प्रभावी ठरेल असे दर्शवत आहे. तसेच यास्थितीत जोखीमही प्रचंड वाढली आहे. त्यामुळे अतिलोभ टाळून, आपापली जोखीम क्षमता विचारात घेऊन, स्टॉपलॉसचे पालन करुन या घसरणीचा लाभ घेता येईल.

◆◆◆

## जागतिक बँकेची 'टाचणी'

भारतासह शंभरहून अधिक देशांना येत्या काही दशकांमध्ये उच्च उत्पन्न असलेल्या देशांच्या गटात सामील होण्यासाठी अनेक अडथळे पार करावे लागतील आणि जागतिक अर्थसत्ता असलेल्या अमेरिकेतील सध्याच्या दरडोई उत्पन्नाची एक-चतुर्थांश पातळी गाठण्यासही भारताला जवळपास ७५ वर्षे लागू शकतील, असा अंदाज जागतिक बँकेच्या अहवालाने व्यक्त केला.




जागतिक बँकेच्या जागतिक विकास अहवाल २०२४ ह्य 'मध्यम उत्पन्न सापळा' या शीर्षकाच्या अहवालाचा भर हा उच्च दरडोई उत्पन्न पातळीकडे संक्रमण करू पाहणाऱ्या विशेषतः आशियाई देशांवर केंद्रीत आहे. अहवालानुसार, अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाची एक-चतुर्थांश पातळी गाठण्यासाठी चीनला १० वर्षांपेक्षा अधिक तर इंडोनेशियाला ७० वर्षांचा कालावधी लागेल. अमेरिकेचे सध्याचे दरडोई उत्पन्न हे ६८ हजार डॉलरच्या पुढे आहे.जगातील १०८ देशांचा समावेश २०२३ च्या अखेरीस मध्यम-उत्पन्न वर्गात करण्यात आला आहे. या देशांचे वार्षिक दरडोई उत्पन्न हे १,१३६ ते १३,८४५ अमेरिकी डॉलरच्या श्रेणीत आहे. ६०० कोटी लोक वास्तव्य असलेल्या या देशांचा, जागतिक लोकसंख्येत ७५ टक्के वाटा आहे. सर्वात भीषण बाब म्हणजे या देशांतील दर तीनपैकी दोन लोक अत्यंत गरिबीत जीवन व्यतीत करतात आणि भूतकाळात अनुभवलेल्या आव्हानांपेक्षाही भविष्यात गंभीर परिस्थितीला त्यांना सामोरे जावे लागणार आहे. या देशातील वृद्ध लोकांची वाढती संख्या आणि कर्जाच्या पातळीत होणारी वाढ, प्रतिकूल भू-राजकीय आणि व्यापारातील वाढता संघर्ष आणि पर्यावरणाला दूषित न करता आर्थिक प्रगतीचा वेग वाढवण्यात येणाऱ्या अडचणींचा त्यांना सामना करावा लागत असल्याचे अहवालात म्हटले आहे.

## भांडवली लाभाचे नियम बदलल्यानंतर...

**केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये भांडवली लाभ करसंरचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. याचा परिणाम अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही गुंतवणूकदारांवर होणार आहे.**

स्टॉक, म्युच्युअल फंड, रिअल इस्टेट आणि सोने यासारख्या भांडवली मालमत्ता विकून झालेल्या नफ्यावर आकारला जाणारा कर याला भांडवली नफा कर म्हणतात. हा कर मालमत्तेच्या स्वरूपावर आणि होल्डिंग कालावधीवर अवलंबून असतो. एलटीसीजीमध्ये १० टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांपर्यंत (इक्विटीसाठी) माफक वाढ केल्याने, दीर्घकालीन गुंतवणूकदारांना थोडा अधिक कर भरावा लागेल, परंतु सवलतीची मर्यादा १.२५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे अल्प मुदतीच्या गुंतवणूकदारांना मध्यम स्तराचे फायदे मिळतील. एलटीसीजीमध्ये १५ ते २० टक्के वाढ झाल्याचा अल्पकालीन इक्विटी गुंतवणूकदारांवर परिणाम होईल. कर दरांमध्ये किरकोळ वाढ झाली असली तरी, इतरांच्या तुलनेत इक्विटी म्युच्युअल फंड अजूनही आकर्षक गुंतवणूक श्रेणीत आहेत. त्यामुळे, कर दरातील बदलामुळे गुंतवणूकदार




इक्विटी म्युच्युअल फंडाकडे वेगाने वळण्याची शक्यता कमी आहे.

भांडवली नफा कर कमी करण्यासाठी दीर्घ कालावधीसाठी गुंतवणूक ठेवा: तज्ज्ञांचे म्हणणे आहे की एसटीसीजी दर वाढल्यामुळे गुंतवणूकदारांनी त्यांची मालमत्ता दीर्घ कालावधीसाठी ठेवली पाहिजे.

- गुंतवणूकदारांनी एलटीसीजीसाठीच्या सवलतीची मर्यादा १.२५ लाख रुपयांपर्यंत वाढवल्याचा पूर्ण फायदा घ्यायला हवा. यामुळे त्यांना जास्तीत जास्त करमुक्त नफा मिळेल.
- गुंतवणूकदारांनी दीर्घकालीन भांडवली नफा मिळवण्यापेक्षा दीर्घकालीन आणि अल्पकालीन भांडवली तोटा टाळण्यावर भर द्यावा. यामुळे कर दायित्व कमी होईल आणि त्यांना फक्त एलटीजीसी भरावा लागेल.
- इक्विटी लिंक्ड सेव्हिंग्ज स्कीम्स आणि नॅशनल पेन्शन सिस्टमसारख्या गुंतवणुकीवर आयकर कायद्याच्या कलम ८०-सी अंतर्गत गुंतवणूकदारांना कर लाभ मिळतो. त्यामुळे या दिशेने गुंतवणूक करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. हे संभाव्यपणे भांडवली कर कमी करून तुमचे एकूण करपात्र उत्पन्न कमी करण्यास मदत करू शकते.
- गुंतवणूकदारांनी त्यांच्या पोर्टफोलिओचे नियमितपणे पुनरावलोकन केले पाहिजे. त्याचा मोठा फायदा असा होईल की कोणती मालमत्ता कराच्या कक्षेत येत आहे आणि कोणती नाही हे ओळखण्यात त्यांना मदत होईल. नव्या कररचनेत हे अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.
- कर दायित्वाची परिस्थिती आणि वैयक्तिक आर्थिक उद्दिष्टे समजून घेण्यासाठी आणि त्यानुसार पुढील धोरणे आखण्यासाठी गुंतवणूकदार कर व्यावसायिक किंवा आर्थिक सल्लागारांकडून सल्ला घेता येईल.
- गुंतवणुकीत विविधता आणणे आणि आर्थिक सल्लागाराचा सल्ला घेणे ही बाब नव्या नियमांमधील गुंतागुंत कमी करण्यास आणि तुमची रणनीती चांगल्या प्रकारे अंमलात आणण्यास मदत करू शकते. कायदेशीर बदलांबद्दल माहिती असणे देखील महत्त्वाचे आहे. कर दायित्वानंतर तुमचा परतावा वाढवण्यासाठी आगाऊ नियोजन करणे आणि कर नियम समजून घेणे खूप महत्वाचे आहे.

◆◆◆

## घरभाड्याबाबत बदललेले नियम काय आहेत?

तुम्ही तुमचे घर भाड्याने देत असाल आणि भाड्याच्या मिळकतीवर कर वाचवू असा विचार करत असाल तर आता तसे करता येणार नाही. कारण ही करचोरी थांबवण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात काही नियम बदलले आहेत. त्यानुसार आता घरमालकांना घरभाड्यातून मिळणारे उत्पन्न भाड्याचे उत्पन्न म्हणून दाखवावे लागणार आहे.

आयकर कायद्यानुसार, करदात्यांनी कमावलेल्या एकूण उत्पन्नाची ५ प्रकारांत विभागणी केली आहे. यामध्ये पगारातून मिळणारे उत्पन्न, घराच्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न, व्यवसाय किंवा व्यवसायातून मिळणारे उत्पन्न ), भांडवली नफ्यापासून मिळणारे उत्पन्न आणि इतर स्रोतांमधून मिळणारे उत्पन्न यांचा समावेश आहे.

आतापर्यंत, घरमालकाला 'नफा किंवा व्यवसाय किंवा व्यवसायातून मिळणारे उत्पन्न' या शीर्षकाखाली भाड्याचे उत्पन्न दाखविण्याचा पर्याय होता. व्यवसायातून मिळणारा नफा याचा अर्थ असा आहे की तुम्ही कोणत्याही प्रकारच्या व्यवसायातून कमावलेला नफा




या शीर्षकाखाली करपात्र (कर पात्र) आहे. करपात्र रक्कम निश्चित करण्यासाठी तुम्ही एकूण उत्पन्नातून तुमचे खर्च वजा करू शकता.

आता घरमालकांना त्यांच्या घराच्या भाड्याचे उत्पन्न हे मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न म्हणून दाखवावे लागणार आहे. सबब कोणत्याही व्यक्तीला त्याच्या मालमत्तेतून मिळणाऱ्या उत्पन्नावर कर भरावा लागेल. सोप्या भाषेत सांगायचे तर घरभाड्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर आता कर आकारणी करण्यात येणार आहे. हा नवीन नियम १ एप्रिल २०२५ पासून लागू होईल, असे बजेटमध्ये म्हटले आहे.

अर्थात जमीनदारांना काही प्रकारची कर सूट असेल. ते मालमत्तेच्या निव्वळ मूल्यावर स्टँडर्ड डिडक्शन अंतर्गत ३० टक्के कर वाचवू शकतील. याशिवाय घरमालकांसाठी उपलब्ध असलेला आणखी एक मोठा कर बचत पर्याय म्हणजे कर्जावर आकारले जाणारे व्याज. जर तुम्ही कर्ज घेऊन मालमत्ता खरेदी केली असेल किंवा घर बांधत असाल, तर त्याची परतफेड करण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या व्याजामुळे हा कर आकारले जाणार नाही.

◆◆◆

**क्रेडिट कार्ड वापरणे ही सामान्य बाब ठरली आहे. त्याची मर्यादा देखील लाखांच्या घरात गेली आहे. काहीवेळा क्रेडिट कार्डवर खरेदी करताना बिलाचे भान राहत नाही आणि पेमेंटची तारीख येते तेव्हा ग्राहक अस्वस्थ होतात. यातही बँकांनी सवलत दिल्याने किमान रक्कम भरून ग्राहक दंड टाळतात. आता त्यातही कपात केल्याने किमान रक्कम ही खूपच किरकोळ राहिली आहे. ही रक्कम आटोक्यात वाटत असली तरी नकळतपणे आपण व्याजापोटी जादा रक्कम भरणार आहोत, हे लक्षात घ्या. भविष्यासाठी ही बाब नुकसानकारकच आहे.**

## 'मिनिमम अमाउंट' कमी : पण...

ॲक्सिस बँकेने गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यांत क्रेडिट कार्ड ग्राहकांसाठी क्रेडिट कार्डवरील किमान पेमेंट (मिनिमम अमाऊंट) रकमेत कपात केली. आता आयडीएफसी फर्स्ट बँकेने क्रेडिट कार्ड ग्राहकांसाठी मिनिमम पेमेंट अमाउंट कमी करण्याची घोषणा केली. ही घोषणा १ सप्टेंबर २०२४ पासून लागू होईल.

बँका आता क्रेडिट कार्डपोटी भरण्यात येणाऱ्या किमान रक्कमेच्या नियमात बदल करत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँकेने क्रेडिट कार्डवर भरण्यात येणाऱ्या किमान रक्कमेत बदल करण्याचा निर्णय घेतला. हा नियम एका महिन्यात लागू होत आहे. नव्या नियमानुसार ग्राहकाकडे एकूण बिल भरण्याचे पैसे नसतील तर त्याचे किमान दोन टक्के रक्कम भरता येऊ शकेल. नवीन नियम लागू करण्यापूर्वी ग्राहकांना एकूण बिलाच्या किमान पाच टक्के पैसे भरणे बंधनकारक होते. ॲक्सिस बँकेने गेल्या वर्षीच नोव्हेंबर महिन्यात हा बदल केला आहे.

पेमेंटसाठी बँकांचा किमान रक्कम कमी करण्याचा निर्णय हा क्रेडिट कार्डधारकांच्या फायदेशीर आहे की नाही? असे कोणी विचारत असेल तर नाही हेच उत्तर आहे. प्रत्यक्षात कमी



पैसा भरून एकूण शिल्लक रक्कम वाढविणे हे ग्राहकांसाठी धोकादायक आहे.बँका क्रेडिट कार्डच्या बिलावर दरमहा तीन ते चार टक्के व्याज आकारणी करतात आणि हे व्याज वार्षिक ४० टक्के होते. यानुसार थकीत रक्कमेवर किती व्याज जाईल, याचा विचार न केलेला बरा. तज्ज्ञांच्या मते, आयडीएफसी फर्स्ट बँक आणि ॲक्सिस बँकेने क्रेडिट कार्डच्या किमान बिल भरण्याच्या नियमात बदल केल्याने बिल भरणाबाबत सजग नसलेल्या आणि क्रेडिट कार्ड वापराबाबत शिस्त न पाळणाऱ्या ग्राहकांना अधिक आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

**जादा व्याज जाणार**

एक उदाहरण घेता येईल.एखाद्या ग्राहकाचे क्रेडिट कार्डचे बिल एक लाख रुपये आहे आणि पूर्वीच्या पाच टक्क्याच्या हिशोबाने त्याचे किमान बिल पाच हजार रुपये होईल. नव्या नियमानुसार ते दोन हजार रुपये राहिल. पूर्वीच्या नियमानुसार ग्राहंकांना ९५ हजारांवर व्याज भरावे लागत होते तर नव्या नियमानुसार ९८ हजार रुपयांवर व्याज भरावे लागेल. याप्रमाणे नव्या नियमानुसार अधिक व्याज भरावे लागेल. वास्तविक क्रेडिट कार्डवर बँकेकडून व्याज आकारणी जादा केली जाते आणि परिणामी ग्राहकांचे व्याजापोटी अधिक पैसे खिशातून जातील.

**...तर अधिक व्याज**

या नव्या नियमांचे आकलन करताना ग्राहकांनी एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. संपूर्ण बिल भरले नाही तर त्यानंतर क्रेडिट कार्डवर होणाऱ्या व्यवहारावर व्याजमुक्त कालावधीचा लाभ मिळणार नाही. व्यवहाराच्या तारखेपासून व्याज आकारणी सुरू होते. याचाच अर्थ थकीत बिल पुढे नेणे हे ग्राहकांच्या हिताचे नाही. त्यानंतर मिनिमम पेमेंट रक्कम जेवढी कमी असेल त्याप्रमाणात ग्राहकांना शिल्लक रक्कमेवर अधिक व्याज भरावे लागेल.

**ग्राहकांना नुकसान, बँकांना फायदा**

बँकांचे क्रेडिट कार्डवर किमान बिल भरण्यात कपात करण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे कस्टमर डिफॉल्टर होऊ नये. थकीत रक्कम पुढच्या महिन्याच्या बिलात सामील केल्याने ग्राहकांना त्या रक्कमेवर व्याज भरावे लागते आणि त्यामुळे बँकांना अतिरिक्त महसूल मिळतो. तज्ज्ञांच्या मते, क्रेडिट कार्डवर किमान पेमेंटची मर्यादा कमी केल्याने शेवटी बँकांनाच फायदा होणार आहे. किमान रक्कम भरताना ग्राहकांना तात्पुरता मिळणारा दिलासा हा भविष्याच्या दृष्टीने महागडा ठरणारा आहे.

◆◆◆

## सहा वर्षाच्या असेसमेंटसाठी आता एकदाच नोटीस

सरकारने करदात्याच्या क्लिष्ट असेसमेंट प्रकरणाचा लवकर निपटारा करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. यासाठी प्राप्तिकर कायद्यात दुरुस्ती केली आहे. यात वेगवेगळ्या वर्षाच्या असेसमेंटसाठी करदात्याला वेगवेगळ्या नोटीसऐवजी सहा वर्षांसाठी एकच नोटीस पाठविली जाणार आहे.

केंद्र सरकारने असेसमेंट प्रक्रिया लवकर पार पाडण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला. अर्थसंकल्पात काही प्रकरणांमुळे असेसमेंट प्रोसेसमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्राप्तिकर कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव आणला असून तो अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. यामुळे करदात्यांना सुलभता राहिल आणि कामकाजातही वेग येईल. सीबीडीटीचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांच्या माहितीनुसार, तपासांती करदात्यांने चुकवलेला कर किंवा अन्य गोष्टीमुळे असेसमेंट प्रक्रियेला होणारा विलंब टाळण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उलण्यात येणार आहे.या प्रकरणांत सहा वर्षाच्या असेसमेंटला एकत्र केले जाईल. त्याचा निपटारा मात्र बारा महिन्यातच केला जाईल. यानुसार करदात्याला एकच डिमांड नोटीस पाठविली जाईल.

**असेसमेंट इअरसाठी वेगवेगळी नोटीस**

सध्या प्रत्येक असेसमेंट इअरसाठी वेगवेगळी नोटीस पाठविली जाते. त्यामुळे या प्रक्रियेला दहा वर्षापर्यंतचा कार्यकाळ लागू शकतो. अग्रवाल म्हणाले, प्रारंभी तपासांच्या प्रकरणात टॅक्स असेसमेंट दहा वर्षांपर्यंत पाहता येत होते. त्यामुळे वेगवेगळ्या वर्षांसाठी अनेक नोटीसा पाठवाव्या लागत होत्या. प्रत्येक नोटिशीत वेगवेगळी कालमर्यादा असायची. त्यामुळे ही प्रकिया पूर्ण होण्यास वेळ जायचा. परिणामी करदाता आणि कर अधिकाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागायचा. एखाद्याला यावर्षी नोटीस पाठविली गेली तर त्याचा परिणाम पुढच्या वर्षी दिसायचा. 'फायनल टाइम




बारिंग' तारीख अनेक वर्षांपर्यंत पुढे ढकलली जायची.

**कमी काळात निपटारा**

सीबीडीटी प्रमुखांच्या माहितीनुसार, पूर्वीच्या सिस्टिममुळे वादाची प्रकरणे वाढत असत आणि ते निकाली काढण्यासाठी बराच वेळ लागायचा. कराच्या दुनियेत 'टाइम बारिंग'चा अर्थ अशी तारीख की त्यापूर्वी टॅक्स अथोरिटीसाठी असेसमेंट पूर्ण करून करदात्याला नोटीस पाठविणे बंधनकारक असते. ही डेडलाइन न पाळल्यास असेसमेंट 'टाइम बार्ड' होतो. याचा अर्थ त्या कालावधीच्या काळात जादा कराच्या असेसमेंटवरील टॅक्स अथॉरिटीचा कायदेशीर अधिकार संपणे.

**सहा वर्षांत एकदाच तपासणी**

ही समस्या दूर करण्याात सीबीडीटीने कन्सोलिटेड असेसमेंटची भूमिका अंगीकारली. सहा वर्षाच्या टॅक्स असेसमेंटची तपासणी एकदाच केली जाईल. त्यानंतर सर्व वर्षांसाठी एकदाच नोटीस आणि त्यानंतर सिंगल असेसमेंट ऑर्डर पाठविली जाईल. या बदलामुळे आता वेगवेगळ्या वर्षांसाठी वेगवेगळी नोटीस पाठविण्याची गरज राहिली नाही. नव्या पद्धतीत टॅक्स असेसमेंटशी संबंधित किचकटपणा संपेल आणि प्रक्रिया पूर्ण होण्याचा कालावधी कमी राहिल.

**वर्षभरात असेसमेंट पूर्ण करावी लागणार**

'फायनल ॲथोरायजेशन'पासून बारा महिन्याच्या आत असेसमेंट पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे करदाता आणि प्राप्तिकर विभाग या दोघांच्याही कामकाजात सुलभता येईल. 'कन्सोलिडेशन' म्हणजेच एकत्रितपणाचा परिणाम अपिल प्रकरणातही दिसेल. १ सप्टेंबर २०२४ आणि त्यानंतर केलेल्या सर्व प्रकरणांत प्राप्तिकर कायद्यातील दुरुस्तीचे पालन करावे लागणार आहे.

◆◆◆

# 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ उनका चातुर्मास सावेडी मे है।



कर्म आठ प्रकारचे आहे. या आठ कर्मात सर्वात अवघड कर्म आहे, ''मोहनीय कर्म''. मोहनीय कर्म हा आत्म्याचा खरा विश्वास व खरे आश्वासनाला नष्ट करणारे एक साधन आहे. सर्व आठ कर्मामध्ये मोहनीय कर्मावर ताबा मिळवणे सर्वात अवघड आहे.

एकदा जर मोहनीय कर्मावर विजय मिळवला, तर काही जन्मातच आपली मुक्ति सुनिश्चित होते. ज्या कर्माच्या उदयाने मोह, राग, द्वेष आदि विकासभावचा अनुभव करतो त्यास मोहनीय कर्म म्हणतो, म्हणजेच कर्म आत्म्याचे सम्यकतत्त्व व चरित्र गुणाचा घात करतात, ते मोहनीय कर्म आहे. मोहनीय कर्माचा स्वभाव हा व्यसनासमान आहे. मोहनीच कर्म जागृत झाल्याने जीव आपला विवेक सोडतो व त्याला कशात नफा, नुकसान आहे याचे देखील भान राहत नाही. काम, क्रोध, माया, लोभ आदि मोहनीय कर्मामुळे जागृत होतात. जसे– दारू पिणारा व्यक्तीला दारू पिल्यावर काय बोलावे, कसे बोलावे ह्याचे भान राहत नाही. ह्याच कर्माच्या उदयाने प्रभू श्रीरामांसारखे महापुरुष देखील लक्ष्मणाचे मृत शरीर सहा महिने आपल्या खांद्यावर घेऊन फिरत होते, हे मोहनीय कर्मामुळेच. मोहनीय कर्म हा कर्माचा राजा आहे.

जसे– जर राजा नसेल तर प्रजा असमर्थ होते. त्याचप्रमाणे मोहनीच कर्माच्या अभावाने व्यक्ती सर्व कर्म आपल्या कार्यात असमर्थ होतात.

सामान्य भाषेत जर विचार केला तर मोह म्हणजे आसक्ती. जे कर्म आत्म्याला मोहित करतात, म्हणजेच चांगल्या वाईट गोष्टीचा फरक न समजणे यालाच मोहनीय कर्म असे म्हणतात. सर्व कर्मावर विजय मिळवणे सोपे, परंतु मोहनीय कर्मावर विजय मिळवणे सर्वात कठीण आहे.

जेव्हा कोणत्याही आत्म्याला केवल ज्ञान प्राप्त होते, म्हणजेच सर्वात आधी ज्या कर्माचा क्षय होतो, ते मोहनीय कर्म आहे. मोहनीय कर्म, जेव्हा संपुष्टात येतो, त्याच्या पुढच्या क्षणाला ज्ञानवर्णिय, दर्शनावर्णिय आणि अंतरायकर्म ह्या तिन्ही कर्माचा एकच वेळेस नाश होतो व जीव केवलज्ञानी होतो.

एका जिज्ञासु व्यक्तिने विचारवंतांना विचारले, महापुरुष कोण आहे? महापुरुषाचे जीवन महान असते. त्यांची महानता आणि शालिनता तेव्हा प्रकट होते, जेव्हा ते या संसारात येतात आणि आपल्या बरोबर भरपूर आनंद घेऊन येतात. हा आनंद प्रत्येक माणसापर्यंत पोहचवतात. जेव्हा संसारातून ते निघून जातात तेव्हा आनंदाचा खजिना वाटत जातात. हे आहे महापुरुष आणि त्याच्या जीवनाची अद्भूत विलक्षणता. आनंद तेच देऊ शकतात जो आपल्या कौतुकाने, स्तुतीने भारावून जात नाही किंवा ज्याला आत्मप्रौढी होत नाही. कोणी निंदा केली तर नाराज होत नाही. गुलाबाचे फुल झाडाच्या फांदीवर असते, तेव्हासुद्धा ते हसत असते व फुलत असते. फुल तोडून फेकले तरी ते हसत असते.

आगमसुत्रात चार प्रकारचे भाव सांगितले आहे. त्यात चतुर्थ भाव आहे. मानवभाव, जो येताना प्रकाशमय होऊन येतो आणि जाताना संपूर्ण जगाला प्रकाशमय देवून जातो. असे दिव्यात्मा आचार्य भगवंत श्री आनंदऋषीजी म.सा. यांनी असा प्रकाशमय पसरवला. ज्याद्वारे पृथ्वीचे कणकण प्रकाशमय झाले.

गुरुदेव आचार्य भगवंताची आज जन्मजयंती आहे (श्रावण शुद्ध प्रथम), त्यांचे संपूर्ण जीवन साधनेने ओतप्रोत आहे. त्यांच्या प्रत्येक वाक्यात सत्यता आणि सिद्धि होती. त्यांच्या लहानपणातील एक प्रसंग आहे.

आनंदऋषीजी म.सा. यांचे संन्यास व्रत घेण्याआधी त्यांचे नाव नेमीचंद होते. वांबोरीला रतनऋषीजी म.सा. यांचा चातुर्मास होता. नेमीचंदजी व त्यांची आई दर्शनासाठी वांबोरीला गेले असता, तेथे रतनऋषीजी म.सा. यांनी नेमीचंदजी यांची प्रतिभा ओळखली व त्यांच्या आईंना सांगितले कि, हा मुलगा तुमच्याकडे असेल तर तुमच्या कुलचे नाव रोशन करेल. पण ह्याला जर आमच्याकडे सोपवले तर संपूर्ण समाजाचे नाव रोषन करेल. ह्यावर आईने त्यांना सहमती दिली आणि पुढे नेमीचंदजी दिक्षा (संन्यास) मिरीमध्ये संपन्न झाली व पुढे त्यांचे नाव 'आनंदऋषी हे नामकरण झाले.

धर्म हा तोडण्यासाठी नाही तर जोडण्यासाठी आहे, हा मानवकल्याणाचा मूलमंत्र मानून सुमारे '७५' वर्षे देशभर भ्रमण करून हा संदेश त्यांनी दिला. भगवान महावीरांचे तत्त्वज्ञान हजारो वर्षे पोथ्यात बंदिस्त होते ते सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य आनंदऋषीजींनी केले. जैन धर्मग्रंथ आणि अन्य धर्माची शिकवण यांचा सांगड हे त्यांच्या शिकवणुकीचे वैशिष्ट्य होते. त्यांनी अन्य धर्माचादेखील बारकाईने अभ्यास केला होता.

आचार्य आनंदऋषीजी हे फक्त जैन समाजाचे गुरू नसून सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान आहे.

**– सौ. सविता चोरडिया**

# वाडियापार्क जलतरण तलाव सुरू करा अन्यथा आंदोलन

## भगवान फुलसौंदर यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – वाडिया पार्क जलतरण तलाव सुरु करावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा माजी महापौर भगवान फुलसौंदर व स्विमिंग सदस्यांनी दिला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना भगवान फुलसौंदर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी स्विमिंग सदस्य अनिल रामदासी, नितीन घोडके, सचिन पवार, प्रसाद जोशी, विकास पांडे, प्रमोद विश्वकर्मा आदी उपस्थित होते.



वाडिया पार्क जलतरण तलाव सुरू करण्याबाबत माजी महापौर भगवान फुलसौंदर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना निवेदन देण्यात आले. (छाया – उदय जोशी)

या निवेदनात म्हटले आहे की, जलतरण तलाव गेली ६ वर्षापासून नागरिकांसाठी चालू होता परंतू गेली आठ दिवसापासून जलतरण तलाव ठेकेदाराने अचानक बंद केला आहे. जलतरण तलावात ज्येष्ठ नागरिक तसेच अनेक खेळाडू, शुगर, बीपीचे पेशंट लाभ घेतात. या तलावाच्या माध्यमातून अनेक जलतरण खेळाडू तयार झाले आहेत. पोहण्याच्या व्यायामाने अनेक लोक निरोगी झाले आहेत. ठेकेदार कंपनीने जलतरण तलाव अचानक बंद केल्याने खेळाडू व नागरिक हे जलतरणापासून वंचित झाले आहेत. तलावात साधारण नगर शहरातील विविध भागातील नागरीक येतात. तलाव बंद असल्याने नागरिकांचे हाल होत असून तलावाचे रिटेंडर करून जलतरण तलाव पुन्हा सुरू करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# स्व. अनिल राठोड यांच्या पुण्याईचा उपयोग करून घ्या

## शिवसेना पदाधिकाऱ्यांना शरद पवार यांचे निर्देश; पुण्यात सदिच्छा भेटीदरम्यान नगर विधानसभेसंदर्भात सूचक वक्तव्य

नगर – नगर शहर विधानसभा मतदारसंघात दिवंगत आमदार अनिल राठोड यांनी भरीव असे काम केले आहे. त्यांच्या पुण्याईचा उपयोग आपल्याला आगामी निवडणुकीत निश्चितपणे होऊ शकतो याबाबत आपण शिवसेना (उबाठा)च्या विधानसभा जागे संदर्भात निर्णय घेण्यास सक्षम असलेल्या वरिष्ठांशी आपली चर्चा झाली असल्याचे सूचक वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे.



पुण्यात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या भेटीप्रसंगी विक्रम राठोड, गिरीष जाधव, मंदार मुळे.

पुणे येथे मोदी बागेत शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची शरद पवार यांच्याशी भेट झाली. त्यावेळी त्यांनी नगरसेवक विधानसभा मतदारसंघाच्या जागे संदर्भात सखोल चर्चा केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अंकुश कानडे शिवसेना उबाठा गटाचे पुणे जिल्हा प्रमुख आणि पदाधिकारी उपस्थित होते.

पुण्यात एका कार्यक्रमा दरम्यान टिळक स्मारक येथे युवा सेना प्रदेश सहसचिव विक्रम राठोड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख उबाठा गट, गिरीश जाधव, मंदार मुळे यांची शरद पवार यांच्या समवेत भेट झाली. आपले शुभाशीर्वाद आम्हाला हवे आहेत असे पदाधिकाऱ्यांनी म्हटले. त्यावेळी त्यांनी कार्यक्रम संपल्यानंतर मोदी बागेत भेटा असे निर्देश दिले. आमदार रवींद्र धंगेकर यावेळी त्यांच्या समवेत होते.

नंतर या पदाधिकाऱ्यांनी तात्काळ मोदी बाग गाठले. शरद पवार यांनी त्यावेळी पदाधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. आणि नगर शहर विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या घडामोडींबद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली. ही निवडणूक आपल्याला जिंकायची आहे. आमदार अनिल राठोड यांनी या मतदारसंघात भरीव असे कार्य केलेले आहे. त्यांच्या अकाली जाण्यानंतर त्यांचे पुत्र विक्रम राठोड यांची या मतदारसंघावर पकड आहे. शिवसेना या भागात सक्षमपणे कार्यरत आहे. याविषयी समाधान व्यक्त केले. दिवंगत माजी आमदार अनिल राठोड यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मोठा असून त्यांचे विचार आणि वारसा पुढे नेणाऱ्या उमेदवारालाच चांगली संधी आणि यश मिळेल याविषयी आपल्या मनात तीळमात्र शंका नाही. आपण सेनेच्या वरिष्ठांशी याबाबत सखोल चर्चा केली आहे. त्यांच्या पुण्याईचा उपयोग सेनेने करून घ्यावा आणि ही जागा निश्चितपणे जिंकण्याची संधी सोडू नये असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी राठोड, जाधव आणि मुळे यांनी पवार यांना दंडवत घालून चरण स्पर्श केला. पवार यांनी यशस्वी व्हा असा आशीर्वाद त्यांना दिला. या घटनेमुळे शिवसेना कार्यकर्त्यांमधला हुरूप वाढला असून आमदार अनिल राठोड यांच्याशी गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवल्याशिवाय आपण गप्प बसणार नाही असा ठाम निर्धार यावेळी सर्वांनी केला. मागील दोन टर्म निवडणुकीत ज्यांनी ज्यांनी स्वार्थी कपटी राजकारण केले याचा वचपा या निवडणुकीत निश्चितपणे काढू असे सर्वांनी म्हटले.

# माजी सैनिकाचा मुलगा झाला पोलिस उपनिरीक्षक

नगर – जिद्द आणि अथक परिश्रमांच्या बळावर नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील माजी सैनिकाचा मुलगा पोलिस उपनिरीक्षक झाला आहे. अमितकुमार मच्छिंद्र धामोरे याने हे यश मिळवले आहे. इतकेच नव्हे तर एमपीएससी परीक्षेत विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गात तो राज्यात १२ वा आला आहे.



अमितकुमार धामोरे

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२२ च्या जाहिरातीनुसार त्याने परीक्षा दिली होती. या परीक्षेचा अंतिम निकाल १ ऑगस्टला जाहीर झाला आहे. त्यात अमितकुमार धामोरे याने हे यश मिळवले आहे. अमितकुमारचे वडील मच्छिंद्र यांनी भारतीय सैन्यदलात सेवा केलेली असून ते आता निवृत्ती नंतर शेती करत आहेत. अमितकुमारचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या सारोळा कासार शाळेत तर माध्यमिक शिक्षण रयतच्या कर्मवीर विद्यालयात झालेले आहे. नंतर त्याने संगमनेर तालुक्यातील मालदाड येथील श्रमशक्ती कॉलेजमध्ये बी. टेक. ॲग्री पदवी उत्तीर्ण केली.

त्यानंतर त्याने स्पर्धा परीक्षेची काही दिवस घरी राहून तर काही दिवस पुणे येथे अभ्यासिकेत तयारी केली आणि एमपीएससीची परीक्षा दिली. आपल्याला पोलिस सेवेतच जायचे आहे, यासाठी त्याने अभ्यासाबरोबरच प्रचंड प्रमाणात व्यायामही केला. अखेर त्याच्या कष्टाचे चीज झाले आहे. परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यावर गावातील ग्रामस्थ यांनी त्याची गावातून सवाद्य मिरवणूक काढत या यशाबद्दल त्याचे गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

# शेअर बाजारात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी झाली मोठी घसरण

## काही मिनिटांतच गुंतवणूकदारांचे जवळपास १० लाख कोटी रुपये बुडाले

मुंबई – अमेरिकेतील संभाव्य मंदीची भीती तसेच मध्य-पूर्वेतील (इस्रायल-इराण) यांच्यातील दिवसेंदिवस वाढत्या तणावामुळे सोमवारी, आठवड्याच्या पहिल्या व्यवहार दिवशी, देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. सेन्सेक्स २,४०० अंकांच्या घसरणीसह उघडला तर निफ्टीही ५०० हून अधिक अंकांनी घसरला. मार्केटचे हेवीवेट शेअर्स, एचसीएल टेक आणि टायटन ९% हून अधिक घसरले असून या मोठ्या घसरणीमुळे काही मिनिटांतच गुंतवणूकदारांचे जवळपास १० लाख कोटी रुपये बुडाले.

जागतिक बाजारातील कमकुवत संकेतांच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत शेअर मार्केटमध्ये पडझड झाली तर, अमेरिकेत मंदीची भीती आणि मध्य-पूर्वेत वाढत्या तणावामुळेही गुंतवणूकदार धास्तावले आहेत. अशा जागतिक घडामोडींमुळे जगभरातील शेअर बाजारात मोठी घसरण झाली आहे. त्याचवेळी, भारतीय मार्केटमध्ये सुरुवातीच्या काळात सेन्सेक्स जवळपास तीन टक्क्यांनी घसरून ७८,५८०.४६ अंकांवर आला, तर निफ्टीदेखील जवळपास दोन टक्क्यांनी घसरून २४,२७७.६० अंकांवर आला. मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे गुंतवणूकदारांमध्ये घबराट दिसत आहे.

शेअर बाजारातील या घसरणीमुळे गुंतवणूक करणाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. एकीकडे शुक्रवारी बाजार कोसळल्याने लोकांच्या सुमारे ४ लाख कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले होते, तर सोमवारी अवघ्या काही मिनिटांत गुंतवणूकदारांचे सुमारे दहा लाख कोटींचे नुकसान झाले. हेवीवेट समभागांमधील मोठ्या विक्रीमुळे निफ्टीही २४,३०० अंकांच्या खाली घसरला तर, या घसरणीमुळे बीएसई लिस्टेड कंपन्यांचे मार्केट कॅप १०.२४ लाख कोटी रुपयांनी कमी होऊन ४४६.९२ लाख कोटी रुपयांवर आले.

### या शेअर्सनी बाजाराला घातले खड्ड्यात

लार्जकॅप कंपन्यांपैकी टाटा मोटर्सचे शेअर्स ४.२८% घसरून रु. १,०५० वर आले, तर टेक महिंद्राचा शेअर ३.१७ टक्क्यांनी घसरला आसुन टाटा स्टीलचा स्टॉकही उघडताच ३.८९ टक्के घसरला आणि १५० रुपयांवर आला. याशिवाय, मिडकॅप कंपन्यांमध्ये मदरसन शेअर ७.५३% कोसळला तर, एलआयसी हाऊसिंग फायनान्स शेअर ६.२६% आणि भारत फोर्ग शेअर ५.४४ टक्क्यांनी खाली आला आहे.

दुसरीकडे, स्मॉलकॅप कंपन्यांमध्ये न्यूक्लियस शेअर १३.२८%, एसीआय शेअर ७.१६ टक्क्यांनी खाली ट्रेंड करत आहे. तसेच किर्लोइसकर ब्रदर्स शेअर ६.९६%, तर फिनिक्स लिमिटेड शेअर ६.९८ टक्क्यांनी आपटला आहे.

# नगरमधील कांदा व्यापाऱ्यांची ४४ लाखांची फसवणूक; तिघा परप्रांतीय व्यापाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर – व्यापाऱ्याकडून खरेदी केलेल्या कांद्याचे ४३ लाख ९९ हजार ७५४ रुपये न देता त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. नितीन दत्तात्रय चिपाडे (वय ४१, रा. संदीपनगर, सारसनगर) असे फसवणूक झालेल्या कांदा व्यापार्याचे नाव आहे. त्यांनी शनिवारी (दि.३) कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहम्मद कदिर उर्फ चिन्नु सेठ, नुर मोहम्मद, मोहम्मद रिहान (सर्व रा. लखनऊ, उत्तरप्रदेश) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघा परप्रांतीय व्यापार्यांची नावे आहेत. चिपाडे यांचा येथील मार्केटयार्डमध्ये कांदा आडतदाराचा व्यवसाय आहे. त्यांची नुर मो. कदिर अँड कंपनीच्या वरील तिघांसोबत ओळख झाली होती. ते तिघे चिपाडे यांच्याकडे आले होते. चिपाडे व त्यांच्यात कांदा खरेदीविषयी बोलणे झाले होते. त्यानुसार चिपाडे यांनी त्यांना कांदा पाठविण्यास सुरूवात केली. ११ जानेवारी २०२२ पासून ७ ते ८ महिने पाठविलेल्या कांद्याचे पैसेदेखील चिपाडे यांना मिळाले होते.

दरम्यान, त्यानंतर चिपाडे यांनी पाठविल्या २ कोटी ३९ लाख २ हजार ५७४ रुपये कांद्याच्या रक्कमेपैकी १ कोटी ९५ लाख २ हजार ८२० रुपये त्या तिघांनी चिपाडे यांना दिले होते. उर्वरित ४३ लाख ९९ हजार ७५४ रुपये दिले नाही. वारंवार पैशाची मागणी केल्यानंतर त्यांनी टाळाटाळ केली. पैसे मागितले असता चिपाडे यांना शिवीगाळ करून संपवून टाकण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

तपास पोलीस करत आहेत.



बुरूडगाव रोडवरील जुगार अड्ड्यावर छापा टाकून पकडलेल्या जुगाऱ्यांसमवेत कोतवाली पोलिसांचे पथक

# बुरूडगाव रोडवरील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## ९ जुगाऱ्यांकडून १८ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल केला जप्त

नगर – नगर शहरातील बुरूडगाव रोडवर फुलसौंदर मळा येथील जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांच्या पथकाने छापा टाकत जुगार खेळणाऱ्या ९ जणांना पकडले आहे. त्यांच्याकडून सुमारे १८ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रविवारी (दि.४) सायंकाळी ही कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक प्रताप दाराडे यांना रविवारी गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम फुलसौंदर मळा येथील लिंबाचे झाडाखाली तिरट नावाचा हारजितीचा जुगार खेळत आहेत. ही माहिती मिळताच पो. नि. दराडे यांनी तत्काळ गुन्हे शोध पथकाला कारवाई साठी पाठविले. त्यासाठी एका खाजगी मालवाहतुक पिकअप वाहनांमधुन पोलिस पथकाला कामगारांच्या वेशात बसवून पाठविले होते. या पथकाने सायंकाळी ५.४५ च्या सुमारास तेथे जावून छापा टाकत ९ जणांना पकडले. त्यांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांचेकडे १८ लाख ४२ हजार ६५० रुपये किंमतीचा मुद्देमाल आढळून आला. तो जप्त करण्यात आला असुन सदर इसमांच्या विरुध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पो.नि.प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पो.हे.कॉ. ए पी इनामदार, विशाल दळवी, म.पो. ना.संगिता बडे, पो.कॉ. दिपक रोहोकले, सुजय हिवाळे, सत्यम शिंदे, तानाजी पवार, सुरज कदम, अनुप झाडबुके, अतुल काजळे, सचिन लोळगे यांच्या पथकाने केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अवैध दारू विक्री सुरु असलेल्या १० ठिकाणी छापेमारी

## १ लाखाची देशी, विदेशी, गावठी दारु एमआयडीसी पोलिसांकडून जप्त

नगर – एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने रविवारी (दि.४) विशेष मोहीम राबवत पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारू विक्री सुरु असलेल्या विविध हॉटेलवर छापे टाकुन १ लाख १ हजार २६० रुपये किमतीची देशी, विदेशी तसेच गावठी हातभटटीची दारु जप्त केली. तसेच १० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. याशिवाय दारू पिवून गाडी चालवणाऱ्या ७ जणांवरही कारवाई करण्यात आली.



अवैध दारू विक्री सुरु असलेल्या १० ठिकाणी छापे टाकत जप्त केलेल्या दारू साठ्यासमवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

पोलीस स्टेशन हददीतील एम आयडीसी ते छत्रपती संभाजीनगरकडे जाणारे रोडवर, कल्याण रोड, मनमाड रोड, एमआयडीसी परीसरात हॉटेल साईराज, हॉटेल राजयोग, हॉटेल जयविजय, हॉटेल भाउचा धाबा, हॉटेल दोस्ती, तसेच एमआयडीसी परिसरात टपरीचे आडोशाला चोरुन देशी, विदेशी व गावठी दारुची विक्री करणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई स.पो.नि.माणिक चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक देविदास भालेराव, विनोद परदेशी, मनोज मोंढे, विकास जाधव, आढाव, पो.हे.कॉ. गणेश कावरे, साबीर शेख, विशाल थोरात, मुकुंद दुधाळ, नंदकिशोर सांगळे, मिसाळ, पो.ना. बोरुडे, पो.कॉ. किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, भगवान वंजारी, अक्षय रोहोकले, ज्ञानेश्वर तांदळे, राजेश राठोड, सचिन नागरे, सुरज देशमुख, गोरक्षनाथ केदार यांचे पथकाने केली आहे.

# विखे फार्मसीच्या प्रा.डॉ.गणेश गोडगेंना पोटाच्या कर्करोगावर 'पॉलीमेरिक नॅनोपार्टिकल्स' तयार करण्याच्या पद्धतीचा 'पेटंट'

नगर – औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रात होणाऱ्या संशोधनाअंतर्गत डॉ. विठ्ठलराव विखे पाटील औषधनिर्माण महाविद्यालयाच्या फार्मासुटिक्स विभागातील प्रा. डॉ. गणेश रावसाहेब गोडगे, विद्यार्थिनी भाग्यश्री रंधवान, फार्मा केमिस्टरी विभागातील प्रा.मनीष अशोक रासकर व त्यांचे सहकारी संशोधकांच्या पोटाच्या कर्करोगावर पॉलीमेरिक नॅनोपार्टिकल्स तयार करण्याच्या पद्धतीचा पेटंट भारत सरकारच्या पेटंट कार्यालयामार्फत जाहीर झालेले आहे.



नॅनोमटेरियल्सचा लहान आकार आणि उच्च पृष्ठभाग त्यांना पेशींमध्ये प्रवेश करण्यास आणि बायोमोलेक्यूल्सशी सहजपणे संवाद साधण्याची परवानगी देतात. औषध वितरणामध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून शोषण, जैवउपलब्धता आणि स्थिरता सुधारणे शक्य आहे आणि त्यामुळे सामान्य औषधप्रणालीच्या दोषांवर मात करणे शक्य आहे. पॉलिमरिक नॅनोपार्टिकल्स हे १०–१००० एनएमच्या आकाराचे घन कोलाइडल कण असतात आणि ते बायोडिग्रेडेबल आणि बायोकॉम्पॅटिबल पॉलिमर किंवा कोपॉलिमरपासून बनलेले असतात, ज्यामध्ये औषध वाहकाच्या आत अडकवले जाऊ शकते किंवा कॅरिअरच्या पृष्ठभागावर शारीरिकरित्या शोषले जाऊ शकते. ह्या संशोधनामुळे नॅनोकणांमध्ये, विषाणूंच्या आकारात औषध अंतर्भूत करण्यास यश मिळाले आहे.

नॅनो पार्टिकल्स औषधांच्या वितरणासाठी प्रभावी आहेत कारण ते रोगग्रस्त पेशी अगदी अचूकपणे शोधू शकतात आणि औषध त्यांच्यापर्यंत पोहोचवू शकतात. ह्या संशोधनामुळे तोंडाद्वारे घेण्यात येणाऱ्या पोटविकाराच्या प्रचलित पद्धतीमध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे असे संशोधकांच्या वतीने सांगण्यात आले. फार्मासुटिक्स विभागात २०२३ मध्ये हे संयुग बनविण्यात आले. त्याचे पेटंट मिळावे यासाठी १५ मे २०२३ मध्ये अर्ज करण्यात आला होता.

तत्पूर्वी या संयुगाचे विविध पातळ्यावर परीक्षण करण्यात आले. २२ जुलै रोजी या संशोधनास पेटंट मिळाले असे प्रा.डॉ.गणेश गोडगे ह्यांनी सांगितले. ह्यासंशोधनात प्रा.मनीष रासकर आणि प्रा.डॉ.शिवानंद हिरेमठ व विदयार्थी भाग्यश्री रंधवान, कृष्णा भराट, असिफ शेख ह्यांनी ह्या संशोधनात मोलाची भूमिका बजावली.

ह्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे अध्यक्ष मा.ना.डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, मा.खासदार डॉ.सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, प्राचार्य डॉ.पी.वाय.पवार फार्मासुटिक्स विभाग प्रमुख प्रा.डॉ.एस.झेड.चेमटे ह्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

